# पर्यटन मार्गदर्शिका

म. ग्रं. सं. ठाणे.

समर्थउद्योग

# महाराष्ट्र



REFBK-0028601

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
भू प्रवास
१९९
वा. क्र. २२६०९
१४।१५।९६
संदर्भ शाखा (स्थळ

# महाराष्ट्र

## पर्यटन मार्गदर्शक पुस्तिका नकाशासह

## प्रेक्षणीय स्थळांची माहिती (जिल्हावार)

REFBK 0028601
REFBK-0028601

प्रकाशक : संतोष देशपांडे, महाभारत, सरस्वती कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००१
मुद्रक : मुद्रक : राजमुद्रा ऑफसेट, औ. बाद. ✆ ४८२६२७
अक्षरजुळणी : पेज सेटर्स, ई-१६/२/५, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औ,बाद.

© समर्थ उद्योग, औरंगाबाद

मुखपृष्ठावरील छायाचित्र : वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर.

# अनुक्रमणिका


| कोकण | | पान क्र. |
|---|---|---|
| १. | मुंबई | ४ |
| २. | मुंबई उपनगर | ४ |
| ३. | ठाणे | ४ |
| ४. | रायगड | ६ |
| ५. | रत्नागिरी | ८ |
| ६. | सिंधूदुर्ग | ९ |
| **उत्तर महाराष्ट्र** | | |
| ७ | जळगाव | ११ |
| ८. | धुळे | १२ |
| ९. | नाशिक | १२ |
| १०. | अहमदनगर | १३ |
| **पश्चिम महाराष्ट्र** | | |
| ११. | पुणे | १५ |
| १२. | सातारा | १८ |
| १३. | सांगली | १९ |
| १४. | कोल्हापूर | २० |
| १५. | सोलापूर | २१ |

| मराठवाडा | | पान क्र. |
|---|---|---|
| १६. | औरंगाबाद | २२ |
| १७. | जालना | २४ |
| १८. | परभणी | २४ |
| १९. | नांदेड | २५ |
| २०. | लातूर | २५ |
| २१. | उस्मानाबाद | २६ |
| २२. | बीड | २७ |
| **विदर्भ** | | |
| २३. | बुलडाणा | २७ |
| २४. | अकोला | २८ |
| २५. | अमरावती | २९ |
| २६. | यवतमाळ | ३० |
| २७. | वर्धा | ३० |
| २८. | नागपूर | ३० |
| २९. | भंडारा | ३१ |
| ३०. | चंद्रपूर | ३१ |
| ३१. | गडचिरोली | ३१ |

# महाराष्ट्राची संकीर्ण माहिती

**ज्योतिर्लिंगाची स्थाने :** औंढानागनाथ, त्र्यंबकेश्वर, परळीवैजनाथ, भीमाशंकर, वेरुळ

**अष्टविनायक :** ओझर, थेऊर, पाली, महड, मोरगाव, रांजणगाव, लेण्याद्री, सिद्धटेक.

**गणेशाची इतर स्थाने :** कळंब, गणपतीपुळे, चिंचवड, टिटवाळा, नामलगाव, पद्मालय, राजूर, राक्षसभुवन, वेरुळ, सांगली.

**देवीची साडेतीन पीठे :** कोल्हापूर, तुळजापूर, माहूर व सप्तशृंगगड.

**देवीचे इतर स्थाने :** अमरावती, अंबड, अंबाजोगाई, उपळा, करमाळा, मोहटादेवी, राशीन, वज्रेश्वरी, पाटणादेवी, सोनई, मनुदेवी, बिजासनदेवी.

**दत्तस्थाने :** औदुम्बर, कारंजे, देवगड, नृसिंहवाडी, माहूर, पाचाळेश्वर.

**संतांच्या वास्तव्याने पुनीत झालेली स्थाने :** अक्कलकोट, अरण, अरणगाव, आपेगाव, आळंदी, गोंदवले, चाफळ, जांबसमर्थ, तेर, दाणोली, देहू, नरसी, नेवासा, पावस, पुणतांबा, पैठण, माधान, मोझरी, मंगळवेढा, लोणी, शिवथरघळ, शिर्डी, शेगाव, सज्जनगड, देवगड, सोनई, माणगाव.

**धार्मिक ठिकाणे :** अकोट, अकोले, अमळनेर, अंबरनाथ, ऋणमोचन, कचनेर, कनकेश्वर, कुंथलगिरी, कुंभोज, गंगाखेड, जयदेववाडी, जेजुरी, जोतिबा, टाकेद, देऊळगावराजा, नरसिंगपूर, नाशिक, नांदेड, परशुराम, पाल, पुसेगाव, पंढरपूर, प्रकाशे, बत्तीसशिराळा, बहिरम, बार्शी, भद्रावती, मढी, माहुली, मांगीतुंगी, मेहकर, रिथपूर, शहाड, शनिशिंगणापूर, शिखर शिंगणापूर, शुलीभंजन, राक्षसभुवन, हरिहरेश्वर, अट्रावल, आडिवरे, गुहागर, रेडी, वेळणेश्वर, कपिलधार, वृद्धेश्वर, चोरवड, चांगदेव, वालावल.

**महत्त्वाच्या व्यक्तींशी निगडित स्थाने :** आंबडवे, कराड, चोंडी, पवनार, महाड, वढू बु. वर्धा, शिवनेरी, सेवाग्राम, श्रीवर्धन, असोदा, मालगुंड, धरणगाव, राळेगणसिद्धी, शिरोडा

**ऐतिहासिक गावे :** औरंगाबाद, चौल, कौंडिण्यपूर, खुलताबाद, नागपूर, पवनी, पुणे, बीड, मुंबई, सातारा, सांगली, सिंदखेडराजा, सोलापूर, उमरठ, संगमेश्वर, नाणेघाट

**राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये :** कर्नाळा, किनवट, गौताळा, ढाकणे-कोळकाज, ताडोबा, तानसा, नागझिरा, नांदूरमधमेश्वर, पाल व यावल, पेंच, बोर, मेळघाट, रेहेकुरी, राधानगरी, अनेर

**धरणे :** उजनी, कोयना, पानशेत, पैठण, भंडारदरा, विष्णुपुरी

**लेण्या :** अजिंठा, औरंगाबाद, कान्हेरी, कार्ले, कुडा, खरोसा, घारापुरी, उस्मानाबाद, पितळखोरा, बेडसा, भाजे, वेरुळ, लेण्याद्री, लोणाड, पाले.

**किल्ले :** अलिबाग, अर्नाळा, अहमदनगर, उदगीर, औंढा, कंधार, गाविलगड, चंद्रपूर, जयगड, तोरणा, दौलताबाद, नरनाळा, नळदुर्ग, परंडा, पन्हाळा, पारोळा, पुरंदर, प्रतापगड, बाळापूर, मुरूड-जंजिरा, रत्नागिरी, रायगड, लोहगड, विसापूर, वसई, विशालगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग, सिंहगड, हरिश्चंद्रगड, खांदेरी-उंदेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, धारुर

**पर्यटन आकर्षणे :** आंबोली, कळसुबाई, किहिम, घोडबंदर, खंडाळा, चिखलदरा, जव्हार, अलिबाग, तोरणमाळ, पाचगणी, पैठण, फरकांडे, बनेश्वर, महाबळेश्वर,माथेरान, माळशेजघाट, म्हैसमाळ, रामटेक, राजापूर, लोणार, लोणावळा, सहस्त्रकुंड, सौताडा, सोमनाथ, हर्णे, अलिबाग, आक्षी-नागाव, खिंडसी, डहाणू, मुंबई, सावंतवाडी, बांदा.

**गरम पाण्याचे झरे :** उनकेश्वर, उनपदेव, उन्हेरे, वज्रेश्वरी,

**नवीन शहरे :** तारापूर, न्हावाशेवा, बुटीबोरी

**शहरांची बदललेली नावे :** नासिक-नाशिक, बुलढाणा-बुलडाणा.

❊❊❊

# १. मुंबई

महाराष्ट्राची राजधानी. रस्ते, लोहमार्ग, हवाईमार्ग, व सागरी मार्गाचे केंद्र. राष्ट्रीय महामार्ग, क्र. ३, ४, व ८ येथून सुरू होतात. मध्य रेल्वेचे व पश्चिम रेल्वेचे मुख्यालय. आंतरराष्ट्रीय विमानतळ व बंदर. भारताचे शैक्षणिक, औद्योगिक व राजकीय केंद्र. १८८५ साली मथुरादास वसनजी सभागृहात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. १९४२ सालचे 'भारत छोडो' आंदोलन येथील ऑगस्ट क्रांती मैदानावरून सुरू झाले.

येथील गगनचुंबी इमारती, बोरीबंदर, चर्चगेट, बॉम्बसेंट्रलसारखी रेल्वेची भव्य स्थानके व भरधाव धावणाऱ्या लोकल्स दृष्टी दिपवून टाकतात.

मुंबादेवी, बाबुलनाथ, महालक्ष्मी व सिद्धिविनायक मंदिरं दर्शनीय प्रेक्षणीय ठिकाणे : गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉईंट, विधान भवन, वर्ल्ड ट्रेड सेंटर, प्रिंस ऑफ वेल्स म्युझियम, सरदारगृहातील टिळक स्मारक, ऑगस्ट क्रांतिस्तंभ, मणीभवन, राजाबाई टॉवर, कमला नेहरू व जिजामाता उद्यान, तारापोरवाला मत्स्यालय, चौपाटी, नेहरू प्लॉनेटोरियम, नेहरू विज्ञान केंद्र, शिवाजी पार्क, दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सदन, दादर चौपाटी व डॉ आंबेडकराचे स्मारक. घारापुरी लेण्यांसाठी गेट वे ऑफ इंडियाहून स्टीमर्स सुटतात. या लेण्या रायगड जिल्ह्यात आहेत.

# २. मुंबई उपनगर जिल्हा

मुंबईची विभागणी करून या नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली आहे. वांद्रे (पूर्व) हे जिल्ह्याचे मुख्यालय प्रेक्षणीय ठिकाणे : संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, कान्हेरी लेण्या, जोगेश्वरी लेणी, जुहू, वर्सोवा, एरंगल, मढ, मार्वे, मनोरी, गोराई, हे स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारे. गोराईतील एस्सेल वर्ल्ड अत्याधुनिक करमणुकीचे ठिकाण. पवई, तुलसी व विहार ही सरोवरे, पवईतील आय. टी आय. व स्वामी चिन्मयानंदांचे संदिपनी आश्रम. गोरेगावातील मसुराश्रम, आरे दूध डेअरी, व चित्रपट नगरी. सांताक्रूझ व सहार विमानतळ कालिनाचा मुंबई विद्यापीठ परिसर

# ३. ठाणे

<u>अर्नाळा :</u> वसईजवळील प्रसिद्ध जलदुर्ग

<u>अंबरनाथ</u> : प्राचीन हेमाडपंथी भव्य शिवमंदिर. शिल्पकला वाखाणनीय. आगपेट्यांचा, व दारु गोळ्याचा कारखाना, अनेक रासायनिक उद्योग, औद्योगिकदृष्ट्या शहराची प्रचंड वाढ. निवास धर्मशाळा कल्याण - पुणे लोहमार्गावरील तिसरे स्थानक.

<u>घोडबंदर</u> : वसई खाडीवरील बंदर. १७३७ साली पोर्तुगीजांचा हा किल्ला मराठ्यांनी जिंकला. सहलीसाठी रम्य ठिकाण. पर्यटक निवास मुंबई ४३ बोरिवली ८ कि मी

<u>जव्हार</u> : निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण. जुने संस्थान प्रेक्षणीय ठिकाणे जयविलास पॅलेस, हनुमान व सनसेट पॉईटस, भूपतगड. वारली लोकांनी तांदुळाच्या पिठापासून काढलेल्या चित्रांचे संग्रहालय सुरतेच्या स्वारीच्या वेळी श्री शिवाजी महाराजांचे येथील शिर्पामाळावर स्वागत करण्यात आले होते.जवळची ठिकाणे तलासरी मार्गावरील दादरा व कोपरा धबधबा, जयसागर धरण, निवास पर्यटक निवास अंतर ठाणे १४०, मुंबई १६६, नाशिक ८०, त्र्यबकेश्वर ५६, इगतपुरी ६१, डहाणू ६५, कासा ३९ कि मी.

**टिटवाळा** : काळूनदीच्या काठी महागणपतीचे जागृत मंदिर. चिमाजीअप्पांनी वसईत पोर्तुगीजांवर विजय मिळविल्यानंतर हे मंदिर बांधले. येथे कण्वऋषींचा आश्रम होता. शकुंतलेने याच गणपतीची पूजा केली. म्हणून या गणपतीस विवाहविनायक असेही म्हणतात. येथील विठोबाच्या मंदिराच्या गाभाऱ्यात पंढरपूरच्या मंदिरातील भजन ऐकू येते अशी काहींची श्रद्धा आहे. निवास : पर्यटक निवास. अंतर कल्याण कसारा मार्गावरील तिसरे रेल्वे स्थानक. स्टेशनपासून मंदिर ३ कि.मी. सडकेने कल्याण - मुरबाड मार्गावरील गोवेली गावापासून आत ५ कि.मी. मुंबई ६५ कि.मी.

**ठाणे** : ठाणे या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. मुंबईपासून जवळ असल्यामुळे औद्योगिकदृष्ट्या प्रगत शहर. अनेक तलावांनी या शहराची शोभा वाढविली आहे. कोपीनेश्वर मंदिरातील प्रचंड पिंडी व नंदी. मांदार सिद्धिविनायक हे स्वयंभू गणेशस्थान

**डहाणू** : सुंदर व शांत समुद्रकिनारा हे येथील प्रमुख आकर्षण. किल्ला. जवळची ठिकाणे - नरपडचा शांत समुद्रकिनारा व श्री साईबाबांचे मंदिर. कोसबाड येथील अनुताई वाघ व बोर्डीतील आचार्य भिसे याच्या शैक्षणिक संस्था २७ कि.मी. उंच डोंगरावर श्री महालक्ष्मीचे जागृत स्थान.

**तानसा** : तानसा तलाव व सभोवती २१६ चौ.कि.मी. परिसरात पसरलेले वन्य प्राणी अभयारण्य. वाघ व चित्ते येथे आढळतात. श्री रमणनाथ महाराजांची समाधी. जवळची ठिकाणे . माहुली किल्ला, भातसा धरण. निवास : शासकीय विश्रामगृह. अंतर ' अटगाव रेल्वे स्थानक १४ कि.मी. अटगाव स्थानकावर टॅक्सीज मिळतात.

**माळशेजघाट** : ता. मुरबाड सह्याद्री पर्वतावरील एक निसर्गरम्य ठिकाण. गुलाबी रंगाचे फ्लेमिंगो पक्षी ऑगस्ट - सप्टेंबरमध्ये मोठ्या प्रमाणात येथे आढळतात. आळे फाट्याहून कल्याणकडे जाणारा मार्ग याच घाटातून जातो. जवळची ठिकाणे : हरिश्चंद्रगड, शिवनेरी किल्ला, ओझर, लेण्याद्री. निवास पर्यटक निवास. अंतर मुंबई १५४, पुणे, १३४, आळेफाटा ३९ शिवनेरी ४० कि.मी.

**तारापूर** : भारतातील पहिले अणुऊर्जा केंद्र औद्योगिक शहर.

**मलंगगड** : श्री मलंग किंवा हाजी मलंग या नावाने हे स्थान ओळखले जाते येथील किल्ला शिलाहार राजाने बांधला मच्छिंद्रनाथांचे पुरातन मंदिर हाजीमलंग या मुसलमान साधूची कबर. या कबरीच्या पूजेचा मान हिंदूंकडे आहे माघ पौर्णिमेस यात्रा अंतर : कल्याण ३० कि.मी.

**लोनाड** : गांधारी नदीवरील प्रचीन गाव. रामेश्वराचे भव्य पुरातन मंदिर. प्राचीन लेण्यांचा समूह. कल्याण १० कि.मी.

**वज्रेश्वरी** : वज्रेश्वरी, गणेशपुरी व अकलोली या तानसा नदीच्या तीरावरील तीन गावांचा परिसर ऋषिमुनींच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे वज्रेश्वरीस देवीचे मंदिर. पोर्तुगीजांकडून वसई किल्ला जिंकल्यावर चिमाजीअप्पांनी हे मंदिर बांधले येथील प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणजे अकलोली व गणेशपुरीतील गरम पाण्याचे झरे स्वामी नित्यानंद व स्वामी मुक्तानंद यांचे आश्रम दर्शनीय. निवास पर्यटक निवास अंतर वसई ४२, ठाणे ५०, मुंबई ८५ कि.मी. ठाणे, भिवंडी व वसईहून बससेवा.

**वैतरणा** : तलाव, धरण व सभोवतीचा रम्य परिसर. कल्याण-नाशिक मार्गावरील खर्डी रेल्वे स्थानक १३ कि.मी.

**शहाड** : प्रसिद्ध उद्योगपती बिर्ला यांनी येथील टेकडीवर बांधलेले सुंदर विठ्ठल मंदिर मंदिराचे शिल्प व परिसर दोन्हीही विलोभनीय. निवास ' धर्मशाळा. अंतर . कल्याण - नाशिक मार्गावरील पहिलेच रेल्वे स्थानक

# ४. रायगड

**अलिबाग :** रायगड जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण. सुंदर व रमणीय समुद्रकिनारा. प्रेक्षणीय ठिकाणे कुलाबा जलदुर्ग, हिराकोट किल्ला, चुंबकीय वेधशाळा. मराठ्यांच्या आरमाराचे प्रमुख सरदार कान्होजी आंग्रे यांचे जन्म व समाधीस्थान. थळ वायशेत प्रकल्पामुळे या शहराची प्रचंड गतीने वाढ होत आहे जवळची ठिकाणे . किहिम, नागाव, मांडवा हे समुद्रकिनारे. खांदेरी, उंदेरी, रेवदंडा, चौल कोर्लई हे किल्ले. कनकेश्वरचे शिवमंदिर. अंतर : किहिम १२ रेवस २४ पनवेल ७१ मुंबई १०८ कि.मी

**आक्षी-नागाव :** सुंदर शांत समुद्रकिनारा आकर्षक सुरुची बने. चालुक्य काळातील शिलालेख, दीपमाळा नागावातील भीमेश्वर व विष्णू मंदिर. अलिबाग रेवदडा मार्गावर ७ कि.मी.

**उन्हेरे :** उष्ण पाण्याचे कुंड. पालीहून जवळ.

**उमरठ :** नरवीर तानाजी मालुसरे यांचे जन्मगाव. तानाजी व शेलारमामांची समाधी. तानाजीचा भव्य पुतळा पोलादपूरजवळ.

**कनकेश्वर :** श्री परशुरामाने निर्माण केलेल्या कनकडोंगरी या उंच टेकडीवर शंकराचे सुंदर कोरीव काम केलेले मंदिर. येथील शिवलिंगावर सतत गंगेचा प्रवाह वाहत असतो. पायथ्याशी भव्य पुष्करणी. जवळच गोमुखातूनही पाण्याचा सतत प्रवाह वाहत असतो. निवास . धर्मशाळा. अंतर : अलिबाग रेवस मार्गावर १३ कि.मी.

**कर्नाळा** : प्रचंड डोंगरी किल्ला. महाराष्ट्रातील पहिले पक्षी अभयारण्य. किल्ल्याच्या सभोवती साडेचार कि.मी. क्षेत्रात हे अभयारण्य पसरलेले आहे. शेजारचे गाव शिरढोण हे क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मस्थान. अंतर · पनवेल १२, मुंबई ६२ कि.मी.

**किहिम बीच :** अलिबागहून केवळ बारा कि.मी. अंतरावरील अत्यंत रमणीय, शांत व आकर्षक परिसर लाभलेला समुद्रकिनारा. निवासासाठी पर्यटन विभागातर्फे सुसज्ज तंबूंची व्यवस्था. अंतर · पनवेल ८५, मुंबई १३६ कि.मी. येथे येण्यासाठी पावसाळा वगळून मुंबई ते रेवस नियमित बोटसेवा आहे

**कुडा :** माणगाव तालुक्यात मांदाड खाडीच्या मुखाजवळ डोंगरात कोरलेल्या बौद्ध लेण्या जवळच तळेगड किल्ला.

**खांदेरी-उंदेरी** : अलिबागजवळील भव्य जलदुर्ग थळपासून होडीने किल्ल्यास जाता येते.

**घारापुरी** : उरणहून जवळ एका बेटावर सहाव्या शतकात या लेण्या कोरण्यात आल्या. यातील त्रिमूर्तीचे शिल्प ही दगडात कोरलेली अतिशय भव्य व प्रतिभाशाली कलाकृती समजली जाते यात ब्रह्मा, विष्णू, महेश यांची सर्जक, रक्षक व संहारक ही तिन्ही रूपे वेगवेगळ्या आविर्भावात पाहावयास मिळतात. याशिवाय शिवपार्वतीच्या जीवनातील विविध प्रसंग अतिशय कुशलतेने या लेण्यात कोरलेले आहेत. या संपूर्ण शैव लेण्या आहेत. येथे एक प्रचंड हत्ती होता. त्यावरून पोर्तुगीजांनी या बेटास एलिफन्टा हे नाव दिले हा हत्ती आता मुंबईच्या वस्तुसंग्रहालयात आहे. अंतर : मुंबईहून नऊ सागरी मैल. गेट वे ऑफ इंडियापासून स्टीमर्सची व्यवस्था आहे. उरणहून मोरा बंदरातूनही जाता येते

**चौल** : प्राचीन ऐतिहासिक शहर. शिलाहार वंशाची राजधानी. दत्त, रामेश्वर, शीतलादेवी, भगवती, हिंगुळजादेवी ही येथील प्रसिद्ध मंदिरे. हिंगुळजा मंदिराजवळ कोरीव लेणी. येथे मोगल, पोर्तुगीज व मराठेकालीन राजवटींचे अवशेष आढळतात. कोर्लईचा किल्ला येथून जवळ आहे अंतर रेवस ३०, किहिम २७, पनवेल ८९, पुणे १६२, मुंबई १४० कि.मी.

**न्हावा-शेवा :** जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय बंदराची येथे नव्याने निर्मिती. पनवेल ते न्हावा शेवा हा राष्ट्रीय महामार्ग क्र ४ ब हा खास या बंदरासाठी निर्माण करण्यात आला आहे.

**पाली :** सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबानदीचे निसर्गरम्य सान्निध्य लाभलेले अष्टविनायकांपैकी बल्लाळेश्वर गणपतीचे स्वयंभू स्थान. मंदिरातील प्रचंड घंटा चिमाजीअप्पांनी अर्पण केली. जवळच उन्हेरचे गरम पाण्याचे झरे व सरसगड किल्ला. अंतर : खोपोली ३८ पुणे १११ मुंबई १२० कि.मी. खोपोली-पेण मार्गावर ५ कि.मी. अंतरावरून पालीचा रस्ता फुटतो. पनवेल-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाकणपासून पालीस रस्ता जातो.

**पाले :** महाडजवळ डोंगरात कोरलेल्या २९ बौद्ध लेण्या.

**महड :** अष्टविनायकांपैकी श्री वरदविनायक गणेशाचे स्वयंभू स्थान. या स्थानास मढ असेही म्हणतात. निवास . खोपोलीस पर्यटक निवास व हॉटेल्स. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर खोपोली-खालापूर दरम्यानच्या हाळपासून दोन कि मी. आत.

**महाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील सावित्री नदीवर वसलेले निसर्गरम्य शहर. डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी १९२७ साली पाण्यासाठी केलेल्या आंदोलनामुळे येथील चवदार तळ्यास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आंदोलनाची आठवण म्हणून येथे क्रांतिस्तंभ उभारण्यात आला आहे, जवळची ठिकाणे रायगड किल्ला २७, पालेची लोणी ३, सवचे गरम पाण्याचे झरे ५ कि.मी. अंतर मुंबई १७५, पुणे ९९ कि.मी.

**माथेरान :** ता. कर्जत. सह्याद्रीच्या पश्चिम घाटात ८०० मी. उंचीवर वसलेले थंड हवेचे ठिकाण. येथे ३० व्ह्यू पॉईंट्स प्रेक्षणीय आहेत. नेरळ स्टेशनहून छोटीशी आगगाडी माथेरानपर्यंत जाते. मोटारीनेही जाता येते निसर्गाचा वरदहस्त लाभलेले मुंबईपासून सर्वात जवळचे सहलीचे ठिकाण. निवास · पर्यटक निवास, हॉटेल्स. अंतर : नेरळ २१, मुंबई १०८, पुणे १२६ कि.मी.

**मुरुड-जंजिरा :** मुरुड या गावास अतिशय सुंदर समुद्रकिनारा लाभला आहे. किनाऱ्यावर पर्यटकनिवास व हॉटेल्स आहेत. गावात नवाबाचा वाडा प्रेक्षणीय. जवळच राजपुरी खाडीच्या दुसऱ्या तीरावर जंजिरा हा अजिंक्य व बलाढ्य जलदुर्ग. ॲबिसिनियाहून आलेल्या सिद्दीने १७ व्या शतकात हा किल्ला बांधला किल्ल्यातील नवाबाचा वाडा व गुंफा प्रेक्षणीय. मुरुड ते राजपुरी रस्ता आहे. तेथून होडीने जंजिऱ्यास जावे लागते जवळची ठिकाणे . काशिद व नांदगावचे समुद्र किनारे. अंतर . मुंबई १६५, पुणे २३०, अलिबाग ५२ कि.मी.

**रायगड :** ता. महाड. श्री शिवाजी महाराजांनी हा अजिंक्य गड खास राजधानीसाठी १६६४ साली उभारला १६७२ साली याच गडावर राज्याभिषेक समारंभ पार पडला येथूनच त्यांनी दक्षिण दिग्विजयास आरंभ केला. १६८० साली याच गडावर महाराजांचा अंत झाला. प्रेक्षणीय ठिकाणे · शिवाजी महाराजांची समाधी, राजवाड्याचे अवशेष, गंगासागर तलाव, टकमक टोक, जगदीश्वर मंदिर, वाघ्या कुत्र्याचे स्मारक, मेघडंबरी. पायथ्याशी पाचाडला मातोश्री जिजाबाईंचा राजवाडा व समाधी निवास · पर्यटक निवास, विश्रामधाम. अंतर महाड २७, पुणे १२६, मुंबई २०३ कि.मी.

**शिवथर घळ :** या घळीत श्री समर्थ रामदासांनी दासबोधाची निर्मिती केली. या मठास सुंदरमठ म्हणतात. येथे श्री समर्थांचे दहा वर्षे वास्तव्य होते. धुळ्याचे समर्थ भक्त श्री शंकर श्रीकृष्ण देव यांनी १९३० साली या घळीचा शोध लावला. १९६० पासून प.पू. श्रीधरस्वामी यांनी दासबोध जन्मोत्सव सुरू केला भोर-महाड मार्गावर वरंधा घाटात हे स्थान आहे.

**हरिहरेश्वर :** श्रीवर्धन तालुक्यातील अगस्ती ऋषींच्या तपश्चर्येने पावन झालेले धार्मिक स्थान दक्षिण

काशी म्हणून प्रसिद्ध. शुक्ल तीर्थात गायत्री व सावित्री या नद्यांचा संगम होतो. पेशव्यांचे कुलदैवत निवास : धर्मशाळा, पर्यटक निवास अंतर . श्रीवर्धन ८ कि.मी.

**श्रीवर्धन :** पेशव्यांचे मूळ गाव. त्यांच्या घरातील चौथऱ्यावर पेशवे स्मारक बाधण्यात आले आहे सोमजाई देवीचे मंदिर. हे गाव बंदर असून यास निसर्गसुंदर समुद्रकिनारा लाभला आहे. अंतर . हरिहरेश्वर ८, मुंबई २११ कि.मी.

# ५. रत्नागिरी

**अडिवरे :** श्री महाकालीचे जागृत व भव्य मंदिर भक्त निवासात निवास व भोजनाची व्यवस्था. राजापूरपासून ३० कि.मी. जवळच स्वच्छ व विस्तीर्ण कशेळीचा समुद्रकिनारा व तेथील कनकादित्य सूर्यमंदिर

**आंबडवे :** ता. मंडणगड भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आबेडकर याच्या पूर्वजांचे स्थान डॉ, आंबेडकरांच्या राहत्या घराचे स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे.

**गणपतीपुळे :** भारताच्या पश्चिम द्वारावरील, समुद्र किनाऱ्यावर वसलेले गणेशाचे स्वयंभू स्थान. मंदिरामागची संपूर्ण टेकडी गणेशरूप समजून तिच्याभोवती भाविक प्रदक्षिणा घालतात भरतीच्या वेळी मदिराच्या पायथ्याला समुद्राचे पाणी स्पर्शून जाते मंदिरासमोर बारा किलोमीटर लांबीचा रूपेरी वाळूचा समुद्रकिनारा दरवर्षी फेब्रुवारी व नोव्हेंबर महिन्यात मावळतीच्या सूर्याची सोनेरी किरणे श्रीच्या मूर्तीवर पडतात गणपतीपुळ्याप्रमाणेच गणपती गुळे हेही याच जिल्ह्यातले गणेशाचे स्थान आहे. या दोन्ही ठिकाणी गणेश चतुर्थीस गणेश मूर्ती घरी बसवण्याची प्रथा नाही. जवळची ठिकाणे : मालगुंड, जयगड. निवास : पर्यटक निवास अंतर : रत्नागिरी ५०, कोल्हापूर १४४, मुंबई ३७५, पुणे ३३१, बेळगाव २९९, कि.मी मुंबई-गोवा मार्गावर हातखंब्यांच्या अलीकडे निवळी येथून गणपतीपुळे, मालगुंड, जयगड असा रस्ता जातो.

**गुहागर :** श्री व्याडेश्वराचे जागृत देवस्थान जवळची ठिकाणे . हेदवी, वळणेश्वर व तवसाळ

**जयगड :** ता रत्नागिरी. शास्त्री नदीच्या मुखाशी वसलेले सुरक्षित बंदर व किल्ला निसर्गरम्य ठिकाण किल्ला व दीपगृह जवळची ठिकाणे · गणपतीपुळे, मालगुंड अंतर · रत्नागिरी ३३ कि.मी

**डेरवण :** श्री सीतारामबुवा वालावलकर या संत पुरुषाच्या स्मृतीप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या येथील शिवसृष्टीत श्री शिवाजी महाराजाच्या जीवनातील निवडक प्रसंग शिल्परूपात साकार करण्यात आले आहेत. सार्वेडपासून चार कि.मी आत. चिपळूण १२ कि.मी

**परशुराम :** ता. चिपळूण विष्णूचा सहावा अवतार श्री परशुरामाचे मंदिर परशुरामाने आपल्या बाणाने समुद्र हटवून कोकणभूमी निर्माण केली या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथम मंदिर विजापूरच्या आदिलशहाने बाधले. त्यानंतर ३०० वर्षांनी श्री ब्रह्मेन्द्रस्वामींच्या सांगण्यावरून जंजिऱ्याच्या सिद्दीने याचा जीर्णोद्धार केला. काही कारागीर ख्रिस्ती होते. त्यामुळे या मंदिरावर हिंदू, मुस्लिम व ख्रिस्ती स्थापत्यकलेचा प्रभाव दिसतो. मुंबई-गोवा मार्गावर चिपळूणच्या अलीकडे परशुराम फाट्यावरून दीड कि.मी आत येथील रम्य वातावरणात ताजग्रुपने रिव्हर व्ह्यू हे सुंदर हॉटेल बांधले आहे. जवळचे लोटे परशुराम औद्योगिक वसाहत व पोफळीचे जलविद्युत केंद्र.

**पावस :** स्वामी स्वरूपानंद यांचे जन्मस्थान व समाधी मंदिर मंदिराच्या शेजारी आवळीच्या झाडातून एक स्वयंभू गणपती प्रकटला आहे विश्वेश्वर व सोमेश्वर मंदिरे. जवळच गणेशगुळे हे गणेशस्थान पूर्णगड ८, रत्नागिरी २० कि.मी

**मालगुंड :** समुद्रसान्निध्यातील घनदाट वृक्षराजींनी वेढलेले शांत व सुरम्य स्थान. कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत या युगप्रवर्तक कवींचे जन्मस्थान गणपतीपुळ्याहून जवळ.

**मुरुड :** दुर्गादेवीचे मंदिर व त्यातील प्रचड घंटा. सुंदर स्वच्छ, विस्तीर्ण समुद्र किनारा. महर्षि अण्णासाहेब कर्वे यांचे जन्मस्थान. जवळची ठिकाणे : सुवर्णदुर्ग, हर्णे, दापोली.

**रत्नागिरी :** निसर्गरम्य वातावरणात समुद्रकाठी वसलेले शहर. प्रेक्षणीय : रत्नदुर्ग किल्ला, भगवती मंदिर, कलात्मक भोगेश्वर मंदिर, लोकमान्य टिळकांचे जन्मस्थान, सावरकरांचे पतितपावन मंदिर व थिबा पॅलेस. इंग्रजांनी स्वातत्र्यवीर सावरकरांना येथे बदिवासात ठेवले होते. जवळची ठिकाणे : गणपतीपुळे, मालगुंड, जयगड, पावस, मिऱ्या बंदर. येथे अनेक चांगल्या हॉटेल्स आहेत.

**राजापूर :** येथील दैवत धूतपापेश्वर. त्याच्या कृपेने दर तीन वर्षांनी येथे गंगा प्रकट होते. या गगेचा कालावधी कमीत कमी अकरा दिवस असतो ही गंगा १४ कुंडांतून वाहत जाते काही कुंडांत गरम पाणी असते. त्यात स्नान केल्यास त्वचारोग नष्ट होतात राजापूरची ही गंगा अचानक प्रकट होते व अचानक लुप्त होते हा दैवी चमत्कार पाहण्यासाठी यात्रेकरूंची गर्दी असते जवळ उन्हाळे या गावी गरम पाण्याचे झरे आहेत. हे गाव ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. येथे इग्रजांच्या अनेक वखारी होत्या. जैतापूर खाडीतून विदेशांशी व्यापार होत असे निवासासाठी हॉटेल्स आहेत.

**वेळणेश्वर :** शास्त्री नदीच्या मुखावरील वेळणेश्वर हे स्वयंभू व जागृत शिवस्थान. स्वच्छ व विस्तीर्ण समुद्रकिनारा निवास : पर्यटक निवास, वेळणेश्वर निवास. जवळची ठिकाणे हेदवी ६, गुहागर १६, चिपळूण ६० कि मी.

**सुवर्णदुर्ग :** कान्होजी आग्रे यांनी बांधलेला किल्ला. या किल्ल्याचा एक भाग भुईकोट आहे तर एक जलदुर्ग. जवळची ठिकाणे : हर्णे, मुरुड, दापोली

**संगमेश्वर :** या ठिकाणी मोगलांनी सभाजी महाराजास कैद केले. संभाजी महाराजांचे स्मारक. जवळची ठिकाणे : कसबा-संगमेश्वर या गावातील मंदिरे कलात्मक शिल्पांसाठी प्रसिद्ध शास्त्री अलकनंदा या नद्यांच्या संगमावरील संगमेश्वराचे सुंदर मंदिर आरवली, गोळीवली व राजवाडी या गावात गरम पाण्याचे झरे प्रचितगड किल्ला धबधबा. श्री मार्लेश्वराचे जागृत स्थान व धारेश्वर धबधबा.

**हर्णे :** ता. दापोली जि. रत्नागिरी निसर्गरम्य बंदर व समुद्रकिनारा. जवळची ठिकाणे : सुवर्णदुर्ग किल्ला, अंजर्लेचे गणपतीमदिर, पन्हाळे काजीच्या लेण्या, उन्हावरेचे गरम पाण्याचे झरे, बाणकोट किल्ला, निवास : शासकीय व जि प. विश्रामगृह. अंतर . पुणे १७८, मुबई २६२ कि मी.

**हेदवी :** जागृत गणेशस्थान. गुहागर १८ किमी

## ६ . सिंधुदुर्ग

**ओरोस :** १ मे १९८१ रोजी रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन दक्षिण भाग वेगळा करून सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्थापना करण्यात आली. जिल्ह्याचे मुख्यालय.

**आंबोली :** ता सावंतवाडी ६९० मीटर उंचीवरील सह्याद्रीच्या रांगांतील एक सुंदर, निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण. प्रेक्षणीय ठिकाणे सागरदर्शन, टेम्पलव्ह्यू, पार्वती, शिरगावकर, सूर्यास्त, इत्यादी पॉईंट्स. जवळची ठिकाणे हिरण्यकेशी नदीचे उगमस्थान, खंडोबा व महादेव गड बॉक्साईटच्या खाणी १६, नागट्टा धबधबा १०, नारायणगड १० कि मी निवास . पर्यटक निवास. अंतर : मुंबई ५४९, पुणे ३९०, रत्नागिरी २१५, बेळगाव ६४ कि मी

**कणकवली :** श्री. भालचंद्र महाराजा यांचा मठ. जवळच कोकण गांधी अप्पासाहेब पटवर्धन याची गोपुरी. भिरवंडे या २० कि.मी.वरील गावातील रामेश्वर मंदिर.

**कुणकेश्वर :** देवगड तालुक्यातील समुद्राच्या सान्निध्यातील महादेवाचे मंदिर. इ. स. ११०० मध्ये यादवांनी हे मंदिर बांधले. श्री शिवाजी महाराजांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. पांडव आपल्या अज्ञातवासाच्या काळात येथे आले होते. देवगड १५ कि.मी.

**दाणोली :** श्री साटम महाराजांचे मंदिर व समाधी. सावंतवाडी - आंबोली मार्गावर १० कि.मी.

**बांदा :** निसर्गसुंदर परिसर. बांदेश्वर, रामेश्वर ही मंदिरे. रेडे घुमट. जवळची ठिकाणे पत्रादेवी येथील गोवा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांचे स्मारक. नाथ संप्रदायातील संत सोहिरोबानाथांचे स्थान. शिरवल व तिराळी धरण. फुकेरा व पारगड किल्ला.

**माणगाव :** निसर्गसुंदर परिसर दत्तसंप्रदायी श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे जन्मस्थान. दर्शनीय त्यांनी स्थापन केलेले दत्त मंदिर व त्यांचे ध्यानधारणेचे ठिकाण. जांभळीची आड, सिद्धयोग आश्रम जवळची ठिकाणे : सुंदरभाटले येथील गंगोत्री व गायमुखातून वाहणारा जलस्त्रोत. आकेरीचे रामेश्वर देवस्थान व रांगणा किल्ला. अंतर : सावंतवाडी १२, कुडाळ १५ कि.मी.

**रेडी :** गणेश मंदिर. मँगनीजच्या खाणी. यशवंतगड किल्ला जवळची ठिकाणे : तेरेखोल किल्ला, शिरोडा व आरवली.

**वालावल :** श्री लक्ष्मीनारायणाचे देवस्थान एकीकडे कर्लीची खाडी व तिन्ही बाजूंनी वनश्रीने नटलेले डोंगर. कुडाळ १५ कि.मी.

**विजयदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या उत्तरसीमेवरील वाघोटनखाडीच्या मुखावरील शिवाजी महाराजांनी बांधलेला भव्य व भक्कम जलदुर्ग. जवळची ठिकाणे . वाडा येथील विमलेश्वर मंदिर, सैतवडे धबधबा. देवगडचा किल्ला व पवनचक्क्यांद्वारे विद्युतशक्ती निर्माण करण्याचा प्रकल्प.

**शिरोडा :** सुंदर समुद्रकिनारा. मिठागरे गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी या गावास खूप प्रसिद्धी मिळाली. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांचे येथे अठरा वर्षे वास्तव्य होते अनेक गाजलेल्या कादंबऱ्या त्यांनी येथील वास्तव्यात लिहिल्या जवळच्या आरवलीशी त्यांचा निकटचा संबंध होता. साहित्यिक श्री जयवंत दळवी आरवलीचे.

**सावंतवाडी :** पूर्वीच्या सावंतवाडी संस्थानाचे मुख्य ठिकाण निसर्गाचा वरदहस्त लाभलेले गाव. मोती तलाव. नरेंद्र डोंगर प्रेक्षणीय. रंगीत लाकडी खेळणीसाठी प्रसिद्ध.

**सिंधुदुर्ग :** मालवण बदराजवळील श्री. शिवाजी महाराजांनी बांधलेला सुप्रसिद्ध जलदुर्ग या ऐतिहासिक जलदुर्गाचे नाव जिल्ह्यास दिलेले आहे. मालवणहून पडावातून किल्ल्यात जावे लागते. शिवाजी महाराजाच्या हाताचे व पावलांचे ठसे हे येथील एक खास वैशिष्ठ्य. तसेच राजाराम महाराजांनी बांधलेले शिवाजी महाराजांचे मंदिरही वैशिष्ठ्यपूर्ण आहे. हा किल्ला कायमचा अजिंक्य राहावा म्हणून महाराजांनी सभोवती पद्मगड, राजकोट, सर्जेकोट, भरतगड, भगवंतगड इत्यादी भरभक्कम किल्ल्यांची मालिकाच उभारली. जवळची ठिकाणे मालवणचे काजूचे कारखाने, देवबागचा समुद्र किनारा. तारकर्ली येथे पर्यटन विभागातर्फे तंबूंची व्यवस्था निवास विश्रातिगृह मालवणला खाजगी हॉटेल्स. अंतर मुंबई ५०५, पुणे ३९२, कोल्हापूर १५२ कि.मी.

# ७. जळगाव

**अट्रावल :** ता. यावल. मुंजोबाचे मदिर. मोठी यात्रा.

**अमळनेर :** सखाराम महाराजाची समाधी. पूज्य साने गुरुजींच्या वास्तव्याने पुनीत झालेले स्थान राममंदिर प्रसिद्ध.

**आसोदा :** निसर्गकन्या व निसर्ग कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे गाव. जळगावहून जवळ.

**उनपदेव :** ता. चोपडा. निसर्गरम्य परिसर. गरम पाण्याचे झरे.

**चोरवड :** एकमुखी दत्तमंदिर. प्रसिद्ध यात्रा स्थान. भूतबाधेपासून या गावात मुक्ती मिळते. भडगाव पारोळा मार्गावर.

**चांगदेव :** ता. एदलाबाद. तापी व पूर्णा नद्यांच्या संगमावरील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

**चांदसनी :** ता चोपडा. संत बहिरम मंदिर. सर्पदंश झाल्यास मंदिराभोवती पाच प्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे. अडावदहून जवळ.

**जळगाव :** जिल्ह्याचे मुख्यालय. व्यापारी पेठ औद्योगिक प्रगती. विमानतळ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ निसर्ग कवी बालकवींच्या जन्मशताब्दीनिमित्त येथे त्यांचे यथोचित स्मारक उभारण्यात आले आहे. त्यांची प्रसिद्ध कविता 'औदुबर' शिलालेखाच्या रूपात अजरामर करण्यात आली आहे केवळ २८ व्या वर्षी जवळच्या भादली स्टेशनवर त्यांचे अपघाती निधन झाले.

**धरणगाव :** मराठीचे पहिले निसर्गकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी यांचे जन्मस्थान. तसेच देशभक्तिपर गीते लिहिणारे कवी विनायक व कवी तिवारी यांचेही जन्मस्थान. व्यापारीपेठ. येथे इंग्रजांच्या वखारी होत्या. ऑट्रमच्या भव्य बंगल्याचे अवशेष अजूनही येथे शिल्लक आहेत. एरंडोल चोपडा मार्गावरील गाव

**पद्मालय :** ता. एरंडोल. गणपती मंदिर मंदिरासमोर मोठा तलाव. भीमाने येथे बकासुराचा वध केला. कार्तिक महिन्यात मोठी यात्रा भरते.

**पाटणादेवी :** ता. चाळीसगाव. निसर्गरम्य परिसरातील पाटणादेवीचे स्थान. प्रसिद्ध गणिती व ज्योतिषी भास्कराचार्य यांचे जन्मस्थान येथून डोंगर चढून वर गेल्यास डोंगराच्या दुसऱ्या बाजूस पितळखोऱ्याच्या लेण्या आहेत. चाळीसगाव - पाटणादेवी असा रस्ता आहे.

**पारोळा :** भुईकोट किल्ला. झाशीची राणी वीर लक्ष्मीबाईंचे माहेर. धुळे - जळगाव राष्ट्रीय महामार्गावर

**पाल व यावल :** ता. रावेर. सुकी नदीच्या सभोवती १७८ चौ.कि.मी. परिसरात पसरलेले अभयारण्य. थंड हवेचे ठिकाण. जवळची ठिकाणे : शिरवळचे शिवमंदिर ८, उनपदेवचे गरम पाण्याचे झरे १० कि.मी निवास · शासकीय विश्रामगृह. अंतर यावल २०, सावदा रेल्वे स्थानक २५, औरंगाबाद २७८, मुंबई ५५९ कि.मी.

**फरकांडा :** ता. एरंडोल. येथील झुलते मनोरे हे एक आश्चर्य समजले जाते. एक मनोरा हलविल्यास दुसराही मनोरा हलतो. उतावळी नदीच्या काठी एरंडोलपासून ३ कि.मी

**मनूदेवी :** सातपुड्यातील उंच डोंगरावरील देवीचे जागृत स्थान. निसर्गरम्य परिसर, धबधबा, किनगाव मालोदहून रस्ता आहे.

# ८. धुळे

**अनेर धरण** : रम्य परिसर अभयारण्य

**तोरणमाळ :** ता. अक्राणी. सातपुडा रागांत १४६१ मीटर उंचीवर वसलेले थंड हवेचे निसर्गरम्य ठिकाण. पूर्वीच्या मांडू घराण्याच्या राजांचे राजधानीचे ठिकाण. प्रेक्षणीय ठिकाणे · सीताखाली, नागार्जुन मंदिर, यशवंत तलाव व भोवतालच्या खेड्यांतून पसरलेली प्राचीन मंदिरे निवास : पर्यटक निवास. अंतर : नंदुरबार ७६, धुळे १२८ कि.मी.

**धुळे :** जिल्ह्याचे मुख्यालय. गावाच्या मध्यभागातून पाझरा नदी वाहते. एकवीरा देवीचे प्रमुख देवस्थान. इतिहासाचार्य राजवाडे वस्तुसंग्रहालय, राजवाडे सशोधन मंदिर व शंकर श्रीकृष्ण देव यांचे समर्थ वाग्देवता मंदिर, ही शहराच्या भूषणाची स्थाने. मुंबई - आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३ या शहरातून जातो व कलकत्त्याला जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ येथून सुरू होतो व्यापारी पेठ, औद्योगिक व शैक्षणिक केंद्र.

**प्रकाशे** : ता. शहादा. दक्षिण काशी म्हणून प्रख्यात असलेले प्रकाशे हे तीर्थक्षेत्र तापी व गोमाई या नद्यांच्या संगमावर आहे केदारेश्वर महादेव व संगमेश्वर ही येथील मुख्य मंदिरे सिंहस्थात मोठी यात्रा भरते. येथे तापी नदीवर मोठा पूल बांधण्यात आला. जवळ दरावीपूर येथे गरम पाण्याचे झरे.

**बीजासनदेवी :** धुळे - इंदूर राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र - मध्यप्रदेशच्या सीमेवरील देवीचे स्थान. हे देवस्थान घाटात असून परिसर निसर्गरम्य आहे.

# ९. नाशिक

**टाकेद** : ता इगतपुरी जटायू-रावण युद्ध या ठिकाणी झाले येथे रामाने आपल्या बाणाने पाण्याचा झरा निर्माण केला. टाकेदतीर्थ म्हणून हे प्रसिद्ध आहे अंतर · नाशिक ६० कि.मी घोटी, इगतपुरी व भंडारदऱ्याहून जाता येते

**त्र्यंबकेश्वर** : भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक स्थान मंदिर ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी असून उत्कृष्ट शिल्प व स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध पेशव्यानी जीर्णोद्धार केला. दर बारा वर्षांनी नाशिकबरोबर येथेही कुभमेळा भरतो ब्रह्मगिरीवरून गोदावरीचा उगम दर्शनीय ठिकाणे · ब्रह्मगिरी पर्वत, कुशावर्त तीर्थ, संत निवृत्तीनाथांची समाधी, गंगाद्वार व मुक्ताई मंदिर. निवास पर्यटक निवास व धर्मशाळा अंतर : नाशिक ३६, मुंबई १८० कि मी.

**नाशिक** : गोदावरी नदीच्या काठावरील पवित्र तीर्थक्षेत्र. रामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणाने शूर्पणखेचे येथे नाक कापले तेव्हापासून या गावाचे नाशिक हे नाव पडले काळाराम मंदिर येथील मुख्य दैवत. गोदावरीच्या पात्रातील रामकुंडात स्नान करणे अत्यंत पवित्र मानण्यात येते दर बारा वर्षांनी सिंहस्थ पर्वणीत येथे कुंभमेळा भरतो दर्शनीय ठिकाणे : काळाराम, गोराराम, कपालेश्वर, सुंदरनारायण, अहिल्याराम, नारोशंकर मंदिर व त्यातील प्रचंड घंटा, श्री सप्तश्रृंगी देवीची प्रचंड मूर्ती, पंचवटी, तपोवन, मुक्तिधाम, सोमेश्वर जवळची ठिकाणे पांडवलेणी, चांभारलेणी, म्हसरुळच्या जैन लेण्या, त्र्यंबकेश्वर, गंगापूर धरण, समर्थ रामदासांचे तपश्चर्येचे ठिकाण टाकळी, दिंडोरी येथील श्री स्वामी समर्थाश्रम, सप्तशृंगगड. निवास धर्मशाळा, हॉटेल्स अंतर त्र्यंबकेश्वर ३६, कळसूबाई ७०, चांदवड ६०, सप्तशृंगगड ७०, शिर्डी ९७ कि मी

**नांदूर मधमेश्वर :** ता. निफाड १२ चौ कि मी गोदावरीच्या परिसरात पसरलेले अभयारण्य

**मांगीतुंगी** : ता. सटाणा. दिगंबर जैन पंथियांचे सम्मेदशिखरजीनंतर भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे तीर्थस्थान. हे मंदिर उंच पर्वतावर असून ३५०० पायऱ्या ओहत. जवळची ठिकाणे : साल्हेर व मुल्हेर किल्ले निवास : धर्मशाळा अंतर : नाशिक १५० मनमाड ९४, मालेगाव ६६, सुरत १७५, सटाणा ३५ कि.मी

**सप्तशृंगगड** : ता. कळवण देवीच्या साडेतीन पीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान. सप्तशृंगदेवीला महाकाली, महालक्ष्मी, व महासरस्वतीचं ओंकाररूप समजण्यात येत. शुंभनिशुंभ व महिषासुर या पाशवी शक्तींच्या असुरांचा नाश केल्यावर तप साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले. समोरच्या डोंगरावर मार्कंडेय ऋषीचे स्थान आहे. सह्याद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत. त्यावरून या स्थानास सप्तशृंग नाव मिळाले. हा गड १४१६ मी. उंचीवर असून परिसर अत्यंत रमणीय आहे दर्शनीय ठिकाणे : अनेक प्राचीन मंदिरे व कुंड. तांबुलतीर्थ, काजळतीर्थ व अबालतीर्थ प्रसिद्ध. मच्छिंद्रनाथाची समाधी प्रदक्षिणा मार्ग निवास : विश्वस्त मंडळाच्या वतीने धर्मशाळा व भोजनव्यवस्था अंतर · नाशिक-कळवण मार्गावर नांदुरीपासून १० कि.मी घाटाचा पक्का रस्ता आहे. येथूनच गडावर पायी जाण्याचा मार्गही आहे नाशिक ७०, औरंगाबाद २२०, मुंबई २५२ कि.मी. वणी गावातही देवीचे स्थान आहे. सापुतारा हे पर्यटनक्षेत्र येथून जवळ आहे.

## १०. अहमदनगर

**अकोले** : अगस्ती ऋषींचा आश्रम. उत्कृष्ट शिल्पकलेची प्राचीन मंदिरे जवळची ठिकाणे : भंडारदरा धरण, रंधा धबधबा, कळसूबाईचे शिखर. निवास · भंडारदरा येथे पर्यटक निवास अंतर : अहमदनगर १६२, मुंबई २५५ कि.मी.

**अरणगाव** : संत मेहेरबाबांची कर्मभूमी. नगर-दौंड मार्गावरील पहिलेच गाव

**अहमदनगर** : अहमद निजामशहाने या शहाराची स्थापना करून नुकतीच पाचशे वर्षे पूर्ण झाली. निजामशाहीची राजधानी मोगलांशी झुंज देताना चांदबीबीच्या पराक्रमामुळे इतिहासात प्रसिद्ध. येथील भव्य भुईकोट किल्ल्यास १९४२ साली पुन्हा प्रसिद्धी मिळाली पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद इत्यादी राष्ट्रीय पुढाऱ्याना इंग्रजांनी याच किल्ल्यात कारावासात ठेवले होते येथेच पंडित नेहरूंनी प्रसिद्ध पुस्तक डिस्कव्हरी ऑफ इडिया लिहिले. येथे ऐतिहासिक वस्तुसग्रहालय आहे. दर्शनीय . माळीवाड्यातील उजव्या सोंडेचा प्रचड गणपती व सावेडी रस्त्यावरील परमपूज्य श्रीरामकृष्ण क्षीरसागर महाराज यांचे दत्तमंदिर व वेदान्तनगर जवळची ठिकाणे · चांदबीबीचा महाल डोंगरगण या वीस कि.मी अंतरावरील ठिकाणी राम व सीता मुक्कामास होते असे म्हणतात.

**कळसूबाई** : ता. अकोले. सह्याद्रीच्या रागेतील महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर. उंची १६२६ मीटर. जवळची ठिकाणे · भंडारदरा धरण, रधा धबधबा. निवास. भंडारा येथे पर्यटक निवास. अंतर अहमदनगर १७७, नाशिक ९०, मुंबई १८५, पुणे १९१ कि.मी.

**चोंडी** : ता जामखेड. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थान.

**देवगड** : ता नेवासा प्रवरेच्या काठावरील श्री किसनगिरी महाराजांचे समाधीस्थान व दत्तमंदिर परिसर अतिशय स्वच्छ व रमणीय आहे. नगर औरंगाबाद रस्त्यावर ५ कि.मी. आत

**नेवासा** : प्रवरेकाठचे प्राचीन नगर श्री मोहिनीराजांचे स्थान संत ज्ञानेश्वरांनी ज्या खांबास टेकून ज्ञानेश्वरी लिहिली त्या खांबाभोवती सुंदर मदिर निवास मदिरात राहण्याची व्यवस्था. अतर

अहमदनगर ६०, औरंगाबाद ५८, पुणे १७३, मुंबई ३२६ कि.मी.

**पुणतांबा :** ता. कोपरगाव. संत चांगदेवाची समाधी. सात कि.मी. अंतरावर वाकडी हे खंडोबाचे स्थान.

**प्रवरासंगम :** गोदावरी व प्रवरा नदीचे संगमस्थान. जायकवाडी पाणलोट क्षेत्रामुळे पुनर्वसन जुन्या गावातील श्री सिद्धेश्वर, घोटेश्वर व रामेश्वर ही पेशवेकालीन मंदिरे प्रसिद्ध.

**भंडारदरा :** ता. अकोले. भंडारदरा धरण. ऑर्थर तलाव, रंधा धबधबा, कळसूबाई, रतनगड किल्ला असा निसर्गरम्य परिसर लाभल्यामुळे हे ठिकाण सहलीचे आकर्षक केंद्र बनले आहे. ऑर्थर तलावात बोटिंगची सोय आहे. या तलावात आठ कि.मी. अंतरावर उत्तम कोरीव काम असलेले अमृतेश्वर मंदिर आहे. निवास : पर्यटक निवास. अंतर : अहमदनगर १७७, नाशिक ९०, पुणे १९१, मुंबई १८५ कि.मी.

**मढी :** ता पाथर्डी. कानिफनाथाची समाधी. कुंभार, धोबी, वडारी, वैदू, भटके लोकांची येथे रंगपंचमीस मोठी यात्रा भरते. येथे त्यांचे न्यायनिवाडे व लग्नेही होतात. गाढवांची येथे मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होते. जवळच हनुमान टाकळीचे समर्थ रामदासांनी स्थापिलेले मारुती मंदिर व वृद्धेश्वर.

**मोहटादेवी :** ता. पाथर्डी. श्री. रेणुकामातेचे देवस्थान. देवस्थानात निवासाची व्यवस्था. जवळच मायंबा येथे मच्छिंद्रनाथांची समाधी.

**राशीन :** ता. कर्जत. जगदंबादेवीचे देऊळ. आवारात उंच दीपमाळ आहे. आतून पायऱ्या चढून वरपर्यंत जाऊन तेथून ही दीपमाळ हलवता येते. जवळची ठिकाणे : रेहेकुरी अभयारण्य, सिद्धटेक

**राळेगणसिद्धी :** श्री अण्णासाहेब हजारे यांनी येथील उजाड माळरानाचा स्वयंपूर्ण, समृद्ध व आदर्श गावात कायापालट केला. निर्व्यसनी व आदर्श गाव म्हणून देशात प्रसिद्धी. अहमदनगर-शिरुर मार्गावर वाडेगव्हाण ते पारनेर मार्गावर

**रेहेकुरी :** ता. कर्जत. अभयारण्य. येथे चार हजार काळविटे व तीनशे चिकारी आढळतात.

**वृद्धेश्वर :** वृद्धेश्वराचे पुरातन मंदिर. शिवलिंगातून सतत पाणी पाझरत असते. डोंगरावर औषधी वनस्पती सापडतात निवास : धर्मशाळा. पाच कि.मी वरील मायंबा येथे मच्छिंद्रनाथांची समाधी. मढी १०, पाथर्डी २५ कि.मी.

**शनिशिंगणापूर :** ता. नेवासा. शनिदेवाचे जागृत व अद्‌भुत स्थान. या गावात व परिसरात कोणत्याही घराला दारे नाहीत येथे चोरी करणारा आंधळा होतो असा समज आहे. शनीची मूर्ती उघड्यावर असून त्यावर मंदिर बांधलेले नाही. हे स्थान घोडेगाव-राहुरी मार्गावर ५ कि.मी. आत आहे.

**सोनई :** प.पू. योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांनी स्थापन केलेले येथील रेणुका दरबार हे शक्तिपीठ भव्य व उत्कृष्ट भगवती मंदिर.

**शिर्डी :** ता. कोपरगाव. संत साईबाबांचे समाधीस्थान. भारतातील सर्व जातिधर्मांचे लोक दर्शनासाठी येथे येतात. दर गुरुवारी व रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसऱ्यास मोठी यात्रा असते, जवळच साकोलीत उपासनी महाराजांचा आश्रम व कोपरगाव मार्गावर ब्रह्मीभूत जनार्दनस्वामींची समाधी निवास धर्मशाळा, पर्यटन महामंडळाचे हॉटेल अंतर : कोपरगाव १५, नाशिक ९७, मुबई २७२, अहमदनगर ९७, पुणे १८३, औरंगाबाद १५३ कि.मी.

**सिद्धटेक :** ता कर्जत. अष्टविनायकांपैकी भीमा नदीवर श्री सिद्धिविनायकाचे स्वयंभू स्थान. निवास : कै काकासाहेब गाडगीळ धर्मशाळा. अंतर : दौंडहून भीमा ओलांडून ९९, मार्गे राशीन १४२ किमी. चौफुल्याहून मोरगावला जाण्यासाठी जवळचा मार्ग आहे.

**हरिश्चंद्रगड :** ता अकोले. नगर, पुणे व ठाणे या तिन्ही जिल्ह्याच्या हद्दीवर हा किल्ला वसलेला आहे या तीनही जिल्ह्यांतून या किल्ल्यावर जाता येते गड दाट झाडींनी व्यापलेला आहे गडावर मंदिरे व शिलालेख आहेत. अंतर पुणे ११५ कि.मी.

# ११. पुणे

**आळे :** ता जुन्नर. संत ज्ञानेश्वरांनी पैठणला ज्या रेड्याच्या मुखातून वेद वदविले त्या रेड्याची येथे समाधी आहे.

**आळंदी :** इंद्रायणीकाठी संत ज्ञानेश्वराचे समाधीस्थान. मंदिरात अजाणवृक्ष, सुवर्णपिंपळ, नाथांचा पार दर्शनीय. चांगदेवाच्या भेटीसाठी ज्ञानेश्वरांनी जी भिंत चालविली ती भिंत येथे आहे. आषाढी व कार्तिकी एकादशीस मोठी यात्रा भरते निवास धर्मशाळा अंतर पुणे ३१, मुंबई २०१ कि.मी. जवळ डुडुळगावात अडबंगनाथांची समाधी

**ओझर :** ता. जुन्नर कुकडी नदीवरील अष्टविनायकापैकी श्री विघ्नेश्वर गणेशाचे स्थान. जवळची ठिकाणे लेण्याद्री, जुन्नर, शिवनेरी किल्ला, आर्वी उपग्रह केंद्र व खोडद येथील आशिया खंडातील सर्वात मोठी दुर्बिण. निवास धर्मशाळा अंतर लेण्याद्री १४, नारायणगाव १२, पुणे ८५ कि.मी.

**कार्ले :** ता. मावळ मळवली परिसरातील बौद्धलेणी मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गापासून ५ कि.मी. अतरावर उंच डोंगरावर या लेण्या आहेत. येथील चैत्यगृह भारतातील सर्व चैत्यगृहापेक्षा प्रचड आहे, लेण्यांच्या आरंभीच श्री. एकवीरादेवीचे मंदिर आहे. जवळची ठिकाणे लोहगड व विसापूर किल्ले. भाजे व बेडसा लेण्या लोणावळा व खंडाळा थंड हवेची ठिकाणे राजा रविवर्मांनी मळवलीस भारतातील पहिला लिथोप्रेस सुरू केला. त्यांची अनेक लोकप्रिय चित्रे येथेच छापली गेली निवास पर्यटक निवास व शासकीय विश्रामगृह, राष्ट्रीय महामार्गाजवळ. अंतर : मळवली रेल्वे स्थानक ७, लोणावळा १०, पुणे ५६, मुंबई ११४ कि.मी.

**खंडाळा :** ता. मावळ पुणे-मुंबई मार्गावरील सह्याद्रीच्या पश्चिम उतारावरील ६२५ मीटर उंचीवर असलेले थड हवेचे निसर्गरम्य ठिकाण. येथून बोर घाट सुरू होऊन खोपोलीस संपतो पावसाळ्यात धबधब्यांचे दृश्य फारच विलोभनीय असते प्रेक्षणीय पॉईंट्स् राजमाची ड्युकस् नोज, व बैरामजी. राजमाची पॉईंटवरून शिवाजी महाराजांचा राजमाची किल्ला स्पष्ट दिसतो जवळची ठिकाणे . राजमाची, लोहगाव व विसापूर किल्ले. कार्ले, भाजे, बेडसा लेण्या. निवास . कार्ल्याजवळ व खोपोलीस पर्यटक निवास, अनेक हॉटेल्स.

**चिंचवड :** गणेशभक्त मोरया गोसावी यानी येथे जिवंत समाधी घेतली. मोरया गोसावी यांनी स्थापन केलेले मंगलमूर्ती गणेशाचे जागृत स्थान. गेल्या काही वर्षांत या भागाचा प्रचंड औद्योगिक विकास, पुणे-मुंबई मार्गावर पुण्यापासून १५ कि.मी

**जेजुरी :** ता. पुरंदर. श्री खंडोबाराया मल्हारी मार्तंड हे येथील जागृत दैवत. मंदिर किल्लेवजा. पायथ्यापासून महाद्वारापर्यंत पायऱ्यांच्या वाटेवर नवसाच्या २५० दीपमाळा. कडेपठारावर मूळ स्थानाच्या ठिकाणी एक मंदिर आहे निवास शासकीय विश्रामगृह अंतर : जेजुरी रेल्वे स्थानक २ सासवड १६, पुणे ३८, मुंबई २०६ कि.मी.

**तोरणा :** ता वेल्हे. शिवाजीमहाराजानी हा किल्ला सर्वप्रथम जिंकून स्वराज्याचे तोरण बाधले. या परिसरातील हा अतिशय प्रचंड व उंच गड या किल्ल्याचे बांधकाम चालू असतांना महाराजांना सुवर्णमोहरांचा हंडा सापडला. अंतर पुणे ६५ कि.मी

**थेऊर :** ता हवेली. अष्टविनायकांपैकी श्री चिंतामणी गणेशाचे मुळामुठा नदीवरील स्थान. थोरले माधवराव पेशवे यांचे निवासस्थान सती रमाबाईचे वृंदावन. साखर कारखाना. जवळच उरुळीकांचनला निसर्गोपचार केंद्र अंतर · पुणे २५ कि.मी पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ५ कि. मी. आत

**देहू :** ता. हवेली. इंद्रायणी काठावरील श्री संत तुकाराम महाराजाचे जन्मस्थान व समाधीस्थान. दर्शनीय : तुकोबांचे जन्मस्थान, वृंदावन, विठ्ठल मंदिर, चोखामेळा मंदिर, इंद्रायणी डोह व ६ कि.मी. वरील भंडारा डोंगर. अंतर पुणे ३४ मुंबई १३६ देहू रोड रे. स्था ५ कि.मी

**नरसिंगपूर :** ता. इंदापूर. भीमा व नीरेच्या संगमावरील नृसिंहाचे मंदिर. मंदिर किल्लेवजा असून भव्य आहे. निसर्गरम्य ठिकाण.

**नाणेघाट :** कोकण आणि देश यांना जोडणारा प्राचीन घाट वनश्रीने नटलेला प्रदेश. घाटात सातवाहन राणी नागनिकेने कोरलेले लेणे व शिलालेख आहेत. सभोवती चावंड, हडसर, जीवधन हे किल्ले आहेत. जुन्नर व माळशेज घाटात निवासाची व्यवस्था. अंतर जुन्नर २७, पुणे ११५ कि.मी.

**पानशेत :** ता. हवेली. पानशेत व वरसगाव ही जलाशये सहलींची आकर्षक केंद्रे आहेत. येथे जलक्रीडेचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत पर्यटन महामंडळातर्फे वॉटर स्किईंग, वुईंड सर्फिंग, स्पीडबोट, वॉटर स्कूटर्स इ. चित्तथरारक जलक्रीडांची व्यवस्था व्यवस्था करण्यात आली आहे. जवळची ठिकाणे सिंहगड, सिंहगड राष्ट्रीय उद्यान, खडकवासला धरण, तोरणा, राजगड किल्ले निवास पर्यटक निवास अंतर : पुणे ४० कि.मी येथील सहलीसाठी पर्यटन महामंडळाची बससेवा आहे,

**पुणे :** प्रसिद्ध ऐतिहासिक शहर सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक तसेच औद्योगिक महत्त्वाचे केंद्र. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा पाया येथेच रोवला पेशव्यांनी येथूनच त्याला साम्राज्याचे स्वरूप दिले व इंग्रजांच्या आमदानीत येथील लोकमान्य टिळकांनी, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा मंत्र देशाला दिला १९२० पर्यंत पुणे हे स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख केंद्र होते. प्रेक्षणीय ठिकाणे पर्वती, सारसबाग, कसबा गणपती, जंगली महाराज मदिर, पाताळेश्वर, दगडूशेठ गणपती मंदिर, श्री गुळवणीमहाराजांचा आश्रम, चतु:श्रृंगी देवी, विठ्ठल मंदिर* शनिवारवाडा, लालमहाल, विश्रामबागवाडा, महादजी शिंदे यांची छत्री, पेशवे उद्यान, सभाजी उद्यान, बंड गार्डन, पाषाण, कात्रजचे सर्पोद्यान. * गायकवाडवाडा हे लोकमान्यांचे निवासस्थान, म फुलेंचे निवासस्थान, कस्तुरबा स्मारक, * पुणे विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट * टिळक स्मारक मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर. जवळची ठिकाणे खडकवासला, सिंहगड, पानशेत, बनेश्वर, पुरंदर, जेजुरी, गोरगाव, थेऊर, उरुळीकांचन, आळंदी, देहू, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री, भीमाशंकर. पुणे-नाशिक महामार्गावर खोडद येथे आशिया खंडातील सर्वात मोठी दुर्बिण बसविण्यात येत आहे. येथील विमानतळ लोहगावला आहे रेल्वेस्थानक, शिवाजीनगर व स्वारगेट ही येथील तीन बसस्थानके आहेत.

**पुरंदर किल्ला :** ता पुरंदर. पुरंदर व वज्रगड हे जोडकिल्ले. काही वर्षे शिवाजी महाराजांची राजधानी. मोगल सरदार जयसिंग व दिलेरखानाने १६६५ साली या किल्ल्यास वेढा दिला असता केवळ सातशे मावळे हाताशी घेऊन मुरारबाजी देशपांडे यांनी पराक्रमाची शर्थ करून स्वराज्यासाठी येथे बलिदान दिले संभाजीराजे याचा जन्म १६६५. पेशव्यांची सुरूवातीची राजधानी. सवाई माधवराव यांचा जन्म सध्या हा किल्ला राष्ट्रीय छात्रसेना प्रबोधनाच्या ताब्यात आहे जवळची

ठिकाणे सासवड हे सोपानदेवाचे समाधीस्थान व आचार्य प्र के अत्रे यांचे जन्मस्थान अतर सासवड १२, पुणे ३८, मुंबई २०८ कि.मी.

**बनेश्वर** : सहलीचे रम्य ठिकाण. पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावर नसरापूरपासून आत

**बेडसा** : ता मावळ. प्रसिद्ध बौद्ध लेण्या पुण्यापासून ६० कि.मी.

**भाजे** : ता. मावळ लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशी मळवली स्टेशनपासून तीन किलोमीटरवर या बौद्ध लेण्या आहेत एकूण १८ लेण्या आहेत. इ.स. पूर्व पहिल्या शतकातील या लेण्या असाव्यात निवास . कार्ला येथे पर्यटक निवास व शासकीय विश्रामगृह, हॉटेल्स.

**भीमाशंकर** : भीमानदीच्या उगमस्थानी वसलेले भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक स्थान. देऊळ हेमाडपंथी उत्कृष्ट कलाकुसर केलेले आहे. नाना फडणीसानी या मंदिराचा जीर्णोद्धार केला हे थंड हवेचेही ठिकाण असून परिसर निसर्गरम्य आहे. येथे वन्य पशू तसेच पक्ष्यांचे अभयारण्य आहे कोकणकडा व नागफणी कड्यावरून कोकणचे रम्य दर्शन घडते अंतर · पुणे मार्गे मंचर, घोडेगाव १२८ कि.मी. मार्गे राजगुरूनगर ९५ कि.मी मंदिर व नदीचा उगम खेड तालुक्यात आहे, पायऱ्यावरील गावाचा भाग व पर्यटक निवास आंबेगावमध्ये आहे. मुंबई २४९ कि.मी

**मोरगाव** : ता. पुरदर. कऱ्हा नदीवरील अष्टविनायकांपैकी श्री मोरेश्वर गणेशाचे स्वयंभू स्थान. निवास जेजुरीस विश्रामधाम अंतर · जेजुरी १७, पुणे ५५, मुंबई २२५ कि.मी

**राजणगाव** : ता शिरूर अष्टविनायकांपैकी श्रीमहागणपती गणेशाचे स्वयंभू स्थान. जुन्नर लेण्यांच्या समुदायात हे स्थान आहे. कुकडी नदी ओलांडून ३८३ पायऱ्या चढल्यावर मंदिर येते अंतर जुन्नर ५, पुणे ९७ कि.मी

**लोणावळा** : ता. मावळ. सह्याद्रीच्या पश्चिम घाटावर ५९६ मीटर उंचीवर वसलेले थंड हवेचे ठिकाण पावसाळ्यात ट्रेकिंगचे प्रमुख आकर्षण. जवळची ठिकाणे कार्ला, भाजे, बेडसा लेण्या; महडचे अष्टविनायक मंदिर, लोहगड, विसापूर किल्ले, निवासः हॉटेल्स, सॅनेटोरियम, कार्ले येथे पर्यटक निवास.

**लोहगड विसापूर किल्ले** : ता. मावळ हे किल्ले शेजारी शेजारी आहेत पुण्याहून मुंबईस जातांना कार्ले लेण्यांच्या समोर मळवली स्टेशनच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही किल्ले स्पष्ट दिसतात भारतातील पहिला लिथोप्रेस मळवलीच्या रमणीय वातावरणात राजा रविवर्मांनी सुरू केला. रविवर्मांची अनेक लोकप्रिय पौराणिक चित्रे याच प्रेसमध्ये छापली गेली लोहगडच्या पायथ्याशी भाजे लेण्या आहेत निवास कार्ला येथे पर्यटक निवास व शासकीय विश्रामगृह

**वढू बु.** · ता शिरूर भीमानदीच्या काठावरील धर्मवीर संभाजी महाराजांचे समाधीस्थान पुणे-नगर मार्गावर कोरेगावपासून तीनचार कि.मी. आत

**शिवनेरी** : ता. जुन्नर. श्री छत्रपती शिवाजी महाराजाचे जन्मस्थान. १९ फेब्रुवारी १६३० साली महाराजांचा येथे श्री शिवाईदेवीच्या कृपेने जन्म झाला म्हणून त्यांचे नाव शिवाजी हा किल्ला सातवाहन राजांनी बांधला किल्ल्यावर मध्यभागी ५० बौद्ध लेण्या आहेत. या किल्ल्याच्या सभोवती अनेक किल्ले आहेत तसेच १५० लेण्या असलेल्या तीन डोंगरांच्या रांगा आहेत प्रेक्षणीय ठिकाणे शिवाई मंदिर, शिवाजीमहाराजांचे जन्मस्थान, शिवाजी महाराज व जिजाबाईंचे पुतळे, अबरखाना जवळची ठिकाणे नाणेघाट, लेण्याद्री, ओझर. अतर नारायणगाव १९, ओझर १९, पुणे ९३, मुंबई १८४, नाशिक १४२ कि.मी.

**सिंहगड** · ता हवेली. १६७० साली नरवीर तानाजी मालुसरेनी घोरपडीच्या मदतीने डोणगिरीचा

अवघड कडा चढून किल्ल्यात प्रवेश केला व स्वतःचे बलिदान देऊन हा किल्ला जिंकला 'गड आला पण सिंह गेला' म्हणून शिवाजी महाराजांनी या कोंडाणा किल्ल्याचे नाव सिंहगड ठेवले. प्रेक्षणीय ठिकाणे : कौंडिण्येश्वराचे अतिप्राचीन देवालय, राजाराम महाराजाची समाधी, गणेश टाकी, लोकमान्य टिळकांचा बंगला, तानाजी मालुसरेंचा पुतळा निवास : पर्यटक निवास. अंतर · पुणे २४, मुंबई १९४ कि.मी.

# १२ सातारा

**कराड :** कृष्णा-कोयनेच्या सगमावरील प्राचीन शहर नदीवर अनेक मंदिरे व घाट आहेत. कृष्णामाईचे मंदिर प्रसिद्ध. कै. यशवंतराव चव्हाण याची कर्मभूमी व समाधीस्थान. जवळच जकीनवाडी येथे ५४ बौद्धधर्मीय लेण्यां नुकत्याच सापडल्या आहेत. कुठल्याही बौद्धधर्मीय लेण्यामध्ये आजवर न आढळलेले धम्मचक्र येथील गुहा क्र, ६ मध्ये आढळले.

**कोयनानगर :** ता पाटण धरण व शिवाजीसागरचा रमणीय प्रदेश रत्नागिरी जिल्ह्यात पोफळी येथे याच धरणाऱ्या पाण्यापासून वीज केंद्र उभारण्यात आले आहे निवास · शासकीय विश्रामगृह. अंतर · कराड ४९ पुणे २०५ मुंबई ३७५ सातारा ९९ कि.मी

**गोंदवले :** ता माण नामजपाचा व अन्नदानाचा महिमा सागणारे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज याचे जन्म व समाधीस्थान. महाराजांनी अनेक ठिकाणी राम मंदिरांची स्थापना केली. मदिरात निवास व प्रसादाची व्यवस्था. सातारा - पंढरपूर मार्गावर दहिवलीजवळ

**चाफळ :** ता पाटण. श्र ी समर्थ रामदासांनी श्रीरामाच्या मूर्तीची येथे स्थापना केली. त्याना ही मूर्ती अंगापूरच्या डोहात मिळाली समर्थांनी येथे दोन मारुतींची स्थापना केली. समर्थाची शिवाजी महाराजाशी जेथे भेट झाली त्या ठिकाणी स्मारक बांधण्यात येत आहे. कवी यशवंतांचे जन्मगाव. पुणे-कोल्हापूर मार्गावर उंब्रज फाट्यापासून १६ कि.मी आत. सातारा ३५, पुणे १६० कि.मी.

**पाल** : ता कराड. खंडोबाचे जागृत देवस्थान पालीचा खंडोबा असेही यास म्हणतात. सातारा-कराड राष्ट्रीय महामार्गावर काशीळ फाट्यावरून काशीळ तारळे मार्गावर तारळी नदीकाठी

**पाचगणी** : ता महाबळेश्वर. थड हवेचे ठिकाण. पाच डोंगरावर वसलेले गाव म्हणून पाचगणी. निसर्गरम्य प्रदेश प्रेक्षणीय विविध पॉईंट्स, भिलार टेबल लँड, किडीज पार्क, गुंफा, निवासी विद्यालये. जवळची ठिकाणे वाई १२, नाना फडणीसाचे गाव मेणवली १५, धोम १८, महाबळेश्वर १९ कि.मी पुणे ९८, मुंबई (मार्गे पुणे) २५७ (मार्गे महाड) २६६ कि.मी. निवास पर्यटक निवास.

**पुसेवाग** : ता खटाव श्री सेवागिरी महाराजांची समाधी यात्रास्थान

**प्रतापगड** : मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत रोमहर्षक प्रसंग येथे घडला, १० नोव्हेबर १६५९ या दिवशी येथेच शिवाजी महाराज बेसावध असताना अफजलखानाने त्याना मारण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनी प्रसंगावधान राखून बोटातील वाघनखांनी अफजलखानाचे पोट चिरले प्रेक्षणीय ठिकाणे भवानी मंदिर, शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा, अफजलखानाची कबर. निवास महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानाचे विश्रामगृह. अंतर : महाबळेश्वर २०, पाचगणी ३९, वाठार रेल्वे स्टेशन ८५, पुणे १३७, मुंबई २२६ कि.मी

**महाबळेश्वर :** १३७२ मीटर उंचीवर वसलेले थंड हवेचे व सहलीचे ठिकाण तसेच पुरातन धार्मिक क्षेत्र येथील महाबळेश्वराचे देऊळ यादव राजा सिंघनदेवाने तेराव्या शतकात बांधले. श्री. शिवाजी महाराजानी या मदिरास सोन्याचा कळस दिला कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गायत्री या पाच

नद्या येथून उगम पावतात. या पंचगंगेचे येथे देऊळ आहे, निसर्गाचे दर्शन घडविणारे येथे तीस व्ह्यू पॉईंट्स आहे वेण्णा तलावात नौकाविहाराची सोय आहे. येथे लिंगमाला धबधबा आहे, जवळची ठिकाणे पाचगणी, प्रतापगड, वाई. निवास . पर्यटक निवास, हॉटेल्स, अंतर : पुणे १२०, मुंबई (मार्गे पुणे) २८३, मुंबई (मार्गे महाड) २५६, पाचगणी १९, सातारा (मार्गे वाई) ७६, सातारा (मार्गे केळघर) ५४ कि.मी.

**माहुली :** ता सातारा. साताऱ्यापासून ६ कि.मी. कृष्णा व वेण्णा नद्यांच्या संगमावरील पवित्र क्षेत्र. यवतेश्वर व मगळागौरीची मंदिरं प्रसिद्ध उत्तर पेशवाईतील नावाजलेलं न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे जन्मगाव

**वाई :** कृष्णा नदीच्या काठावर वसलेले दक्षिणकाशी म्हणून ओळखण्यात येणारे धार्मिक क्षेत्र. नदीच्या काठावर अनेक घाट व मंदिरे आहेत. येथील भव्य गणेशमूर्ती, विष्णू व लक्ष्मी मंदिर, मोतीबाग व विश्वकोश मंडळ प्रेक्षणीय

**शिखरशिंगणापूर :** ता. माण. श्री शंभू महादेवाचे जागृत स्थान शिवाजी महाराजांचे कुलदैवत

**सज्जनगड :** ता. सातारा. समर्थ रामदासस्वामींच्या वास्तव्याने पावन झालेले ठिकाण. येथे समर्थांची समाधी आहे. या किल्ल्याचे नाव पूर्वी परळी होते. हा किल्ला शिवाजीमहाराजांनी १६७३ मध्ये जिंकला समर्थांच्या वास्तव्यामुळे परळीचे नाव सज्जनगड झाले निवास व प्रसादाची व्यवस्था. सातारा १२ कि.मी.

**सातारा :** अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी शाहू महाराजांनी वसविलेले ऐतिहासिक शहर. १६९९ साली या शहरास छत्रपतींच्या राजधानीचा मान मिळाला. प्रेक्षणीय ठिकाणे . राजवाडा, जलमदिरातील श्री भवानीदेवीचे मंदिर, पुरातत्त्वखात्याचे वस्तुसंग्रहालय, अजिंक्यतारा किल्ला, शिक्षणमहर्षि कर्मवीर भाऊराव पाटील याची समाधी दाक्षिणात्य शैलीचे उत्तर चिदंबरम हे चार गोपुराचे नवीन मदिर जवळची ठिकाणे : परळी मार्गावर अडीच कि.मी. वर खिंडीच्या स्वयंभू गणपतीचे स्थान, मंगळादेवी ११, सज्जनगड १२, माहुली ६ कास तलाव २६ कि.मी अंतर पाचगणी ४५, महाबळेश्वर (मार्गे केळघर) ५१ (मार्गे वाई) ६४, पुणे ११२ मुंबई (मार्गे महाड) २७५ कि.मी.

## १३. सांगली

**औदुंबर** . ता वाळवा कृष्णेच्या काठावरील श्री दत्तात्रयांचे जागृत ठिकाण दर्शनीय ठिकाणे ब्रह्मानदस्वामींचा मठ, पैलतीरावरील भुवनेश्वरीदेवीचे मंदिर अतर भिलवडी रेल्वे स्टेशन ६, सांगली २२, मुंबई ३९९ कि.मी

**बत्तीसशिराळा :** नाग महोत्सवासाठी प्रसिद्ध येथे नागपचमीच्या आदल्या दिवशी जिवत नाग पकडतात व त्यांची नागपंचमीस मिरवणूक काढतात. दुसऱ्या दिवशी हे नाग जेथून आणले तेथेच सोडून देतात. या दिवशी नाग कोणासही चावत नाही ही नागाची यात्रा पाहण्यासाठी दूरदूरचे तसेच विदेशातूनही लोक येतात. गोरखनाथाचे मंदिर सांगली ७३ कि.मी .

**सांगली :** कृष्णा नदीच्या काठावरील ऐतिहासिक शहर. प्रेक्षणीय ठिकाणे गणपतीचे देऊळ, गणेशदुर्ग, हा भुईकोट किल्ला, किल्ल्यातील ऐतिहासिक वस्तुसग्रहालय. या शहराचा विस्तार मिरजपर्यंत झाला आहे. मिरजला भुईकोट किल्ला, मिरासाहेब दर्गा, वानलेस दवाखाना प्रसिद्ध. तंतुवाद्यांच्या निर्मितीसाठी मिरज प्रसिद्ध जवळची ठिकाणे कृष्णा-वारणा संगमावरील हरिपूर,

कृष्णा-येरळा संगमावरील ब्रह्मनाळ, वहेचे रामलिंग, औदुम्बर, नृसिंहवाडी व शिराळे.

## १४. कोल्हापूर

**कुंभोज :** ता. हातकणंगले प्रसिद्ध जैन तीर्थक्षेत्र. वरच्या भागात श्वेतांबर जैनांचे मंदिर असून खालच्या भागात पहिले तीर्थंकर भगवान आदिनाथ याचे पुत्र श्री बाहुबली याचा स्फटिकाचा भव्य पुतळा आहे. या क्षेत्राच्या मागील भागात दुर्गावतीचे मंदिर आहे निवास : धर्मशाळा. अतर : हातकणंगले ११, कोल्हापूर २१, मुंबई ४४६, बेळगाव १४३ कि.मी.

**कोल्हापूर :** ऐतिहासिक व धार्मिक ठिकाण दक्षिण काशी म्हणून धार्मिक महत्त्व येथे करवीरनिवासिनी अंबाबाई महालक्ष्मीचे साडेतीन पीठापैकी एक पीठ आहे हे अंबाबाईचे मंदिर चालुक्यराजा कर्णदेव याने ६३७ साली बाधले. या हेमाडपंथी बांधणीच्या मंदिरावरील कोरीव कलाकुसरीचे काम अप्रतिम आहे. जुन्या राजवाड्यात तुळजाभवानीचे मंदिर आहे. या नगरात श्री दत्तात्रेय दररोज भिक्षेसाठी येतात असे समजतात. येथील श्वेतांबर जैनांचे मुनीसुक्त मंदिर सुंदर नक्षीकामासाठी प्रसिद्ध आहे. इ.स. १२१२ पर्यंत यादवानी येथे राज्य केले त्यानंतर १६७५ पर्यंत मोगलांनी १६७५ साली हे शहर शिवाजीमहाराजांनी जिंकले. १७०८ साली महाराणी ताराबाईंनी पन्हाळ्याहून राजधानी येथे आणली. १८८४ ते १९२२ या ३८ वर्षांच्या कारकीर्दीत राजर्षि शाहू महाराजानी सामाजिक सुधारणा, अस्पृश्यता निवारण व शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केली. या शहराची शिक्षण, कला, क्रीडा नाट्य व चित्रपट उद्योग, कारखानदारी या सर्वच क्षेत्रात अतिशय भरभराट झाली आहे कुस्तीसाठी येथील खासबाग मैदान हे महाराष्ट्रातील एकमेव कुस्तीचे मैदान आहे. यात एकावेळी साठ हजार लोक बसण्याची व्यवस्था आहे, चित्रपट व्यवसायाचे हे माहेरघर समजले जाते. प्रेक्षणीय ठिकाणे नवीन व जुना राजवाडा, रकाळा तलाव, शालिनीप्रासाद, उत्तरेश्वर मंदिर, पंचगंगेवरील घाट, शिवाजी विद्यापीठ, शिवाजी उद्यमनगरी, वस्तुसंग्रहालय व नामवत चित्रपट कलावंत श्री चंद्रकांत मांढरे याचे कलादालन. 'करवीरदर्शन' ही पर्यटन विभागातर्फे कोल्हापूर शहर पाहण्याची व्यवस्था जवळची ठिकाणे कण्हेरी सिद्धीगिरी मठ, १२, बालिंगे कात्यायनीदेवीचे मदिर ८, पन्हाळा १८, ज्योतिबा मदिर १२, विशाळगड ८८ कि.मी. तसेच मौनी मठ व मौनी विद्यापीठ, दाजीपूरचे अभयारण्य व रांगणा किल्ला निवास . धर्मशाळा, हॉटेल्स व पन्हाळा येथे पर्यटक निवास. अंतर बेळगाव १०५ कि.मी

**जोतिबा :** जोतिबा हे स्थान यात्रेसाठी प्रसिद्ध आहे. हे स्थान वाडी रत्नागिरी या गावात उंच डोंगरावर आहे. चैत्री पौर्णिमेस येथे मोठी यात्रा भरते. अंतर कोल्हापूर १९ कि.मी

**नृसिंहवाडी :** ता. शिरोळ. या क्षेत्रास नरसोबाची वाडी असेही म्हणतात कृष्णा-पंचगंगेच्या संगमावर वसलेले जागृत दत्तस्थान येथे स्वयं दत्तात्रेयांचे पादुकांच्या स्वरूपात वास्तव्य आहे या क्षेत्रास दत्ताची राजधानी म्हणतात या क्षेत्राचे अधिपती श्री नृसिंहसरस्वती म्हणजेच नरसोबा यांचा शनिवार हा जन्मदिवस असल्यामुळे येथे शनिवार हा दिवस महत्त्वाचा मानण्यात येतो नरसिंह सरस्वती अवतारात दत्तगुरू १२ वर्षे येथे राहिले म्हणून नरसोबाची वाडी हे नाव पडले. अंतर · कोल्हापूर ३५, बेळगाव १४०, पुणे २६१, मुंबई ४४५ कि.मी

**पन्हाळा** . पन्हाळा किल्ल्यावर संपूर्ण पन्हाळा गाव वसले असून पन्हाळा तालुक्याचे हे मुख्य ठिकाण आहे ९४० मी उंचीवरील थड हवेचे ठिकाण प्रसिद्ध किल्ला. १६५९ मध्ये शिवाजीमहाराजांनी हा किल्ला जिंकला या किल्ल्यातून सिद्दी जोहरच्या वेढ्यातून शिवाजी महाराजांची विस्मयजनक

सुटका व बाजीप्रभूंचा पानवखिंडीतील पराक्रम हे प्रसंग इतिहासात अजरामर झाले आहेत. हा किल्ला भोज किंवा राष्ट्रकुटानी बाराव्या शतकात बांधला. भोजराजाची राजधानी कविवर्य मोरोपंतांचे जन्मस्थान रामचंद्रपंत अमात्यांची समाधी प्रेक्षणीय ठिकाणे : संभाजी मंदिर, सोमेश्वर मदिर, अबाबाई मदिर, नागझरी, पाराशर गुहा, एकमुखी दत्त, सज्जा कोठी, अंबरनाथ, राजदिंडी, तीन दरवाजा, रेडे महाल, तबक बाग. निवास · पर्यटक निवास. अंतर · जोतिबा ९, कोल्हापूर २०, बेळगाव १२३, मुंबई ४२८ कि.मी.

**राधानगरी** : भोगावती नदीच्या परिसरात ३७२ कि.मी. क्षेत्रात वसलेले, गव्यांसाठी प्रसिद्ध अभयारण्य बिबळ्या, चितळ, सांबर येथे आढळतात. राधानगरी धरण व जलविद्युत केंद्र. ३ कि.मी. वर दाजीपूरचे अभयारण्य. अंतर कोल्हापूर ७०, बेळगाव १४८, पुणे ३१०, मुंबई ४८७ कि.मी.

**विशाळगड** : ता शाहूवाडी. बाजी प्रभू देशपांडेच्या हौतात्म्याने अजरामर झालेले ठिकाण. पन्हाळगडावरून सिद्दी जोहरच्या वेढ्यातून निसटून विशाळगडावर शिवाजी महाराज पोहोचून तेथील तोफेचा आवाज कानी येईपर्यंत बाजीप्रभूंनी घोडखिंडीत शौर्याने शत्रूला रोखले. शेवटी त्याच्या हौतात्म्याने घोडखिंडीची पावनखिंड झाली पावनखिंडीत बाजी प्रभूंचे स्मारक. हा गड ३३४४ फूट उचीवर असून गडाचे आवार ३ कि.मी लांब व १ कि.मी. रुंद आहे, निवास · पन्हाळ्यास पर्यटक निवास. अतर पन्हाळा ४९ कोल्हापूर ८८, बेळगाव १९३, पुणे ३२८, मुंबई ३९९ कि.मी

## १५. सोलापूर

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ व श्री गजानन महाराज याच्या वास्तव्याने पावन झालेले ठिकाण ऐतिहासिक शहर. जुने राजवाडे प्रेक्षणीय. मंदिरात निवासाची व प्रसादाची व्यवस्था अंतर सोलापूर ३९, मुंबई ४५० कि.मी

**अरण** : ता. सोलापूर. संत सावतामाळी याचे जन्मस्थान

**उजनी** : ता माढा भीमा नदीवरील मोठे धरण

**करमाळा** : भवानीदेवीचे प्राचीन मंदिर. ९६ पायऱ्यांची अष्टकोनी विहीर. भुईकोट किल्ला

**पंढरपूर** : महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. संतांचे माहेर, वारकऱ्यांचे दैवत व श्रद्धास्थान चंद्रभागेकाठी वसलेले आहे येथे भीमा चंद्रकोरीप्रमाणे दिसते म्हणून ती येथे चंद्रभागा झाली येथे आषाढी यात्रा सर्वात मोठी ज्ञानबा-तुकाराम च्या गजरात सर्व महाराष्ट्रातून येथे पालख्या,दिंड्या येतात विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठलाचे व रुक्मिणीचे मंदिर वेगवेगळे आहेत मंदिरात प्रथम नामदेव पायरीचे दर्शन घेऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात. आता वारीसाठी अनेक मजली इमारत तयार झाली आहे. दर्शनीय ठिकाणे लक्ष्मी, पुंडलिक, विष्णुपद, त्र्यंबकेश्वर, मल्लिकार्जुन, अंबाबाई, श्रीराम व नामदेव मंदिर चोखामेळ्याची समाधी, तसेच संत कैकाडी महाराज, संत तनपुरे महाराज यांचे मठ व भीमेच्या पात्रातील ह.भ.प धुंडामहाराज देगलूरकर व मातोश्री कृष्णामाई यांची मेहूण समाधी. जवळच जनाबाईचे गोपाळपूर आहे निवास पर्यटक निवास, धर्मशाळा, हॉटेल्स, अंतर पुणे २०४, सोलापूर ७४, मुंबई ३८०, औरंगाबाद ३५०, तुळजापूर ११७, नाशिक ४३५, कोल्हापूर १८८ कि.मी

**बार्शी** : येथे भगवंताचे प्रसिद्ध मंदिर आहे अंतर मुंबई ३८८ कि.मी.

**मंगळवेढा** : दामाजीपंत, चोखामेळा व कान्होपात्रा या संतांच्या वास्तव्याने पावन झालेले शहर. अंतर

मुंबई ३९१ कि.मी.

**सोलापूर :** ऐतिहासिक, धार्मिक, औद्योगिक शहर स्वातंत्र्यसग्रामात मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व किसन सारडा यांना १२ जानेवारी १९३१ रोजी इग्रजांनी फाशी देली. त्याचे स्मारक किल्ल्याजवळ हुतात्मा बागेत आहे. विशाल तलावावरील श्रीसिद्धेश्वर देवालय येथील प्रमुख देवस्थान. रूपा भवानी, मल्लिकार्जुन, रेवणसिद्ध दर्शनीय प्रेक्षणीय ठिकाणे · भुईकोट किल्ला, हुतात्मा बाग इंद्रभुवन, शुभराय आर्ट गॅलरी, म. गाधी राष्ट्रीय उद्यान, मोतीबाग, ऑलिंपिक पोहण्याचा तलाव, पार्क चौक जवळची ठिकाणे · पंढरपूर, मंगळवेढे, तुळजापूर, अक्कलकोट.

# १६. औरंगाबाद

**अजिंठा लेणी :** ता सोयगाव. जगप्रसिद्ध कोरीव लेण्या रंगीत भित्तिचित्रासाठी प्रसिद्ध. एकूण तीस लेण्या. काळ ख्रि. पू २०० ते इस ६५०. सर्व लेण्या बौद्धधर्मीय असून खडकांत कोरलेली बौद्धमदिरे, गुंफा, विहार तसेच गौतम बुद्धाच्या जीवनावर कोरलेले अनेक प्रसंग अतिशय रेखीव आहेत. इंग्रज लष्करातील अधिकाऱ्यांना या लेण्याचा १८१९शोध लागला अजिंठा गावापासून अजिंठा लेण्या ११ कि.मी अंतरावर आहेत औरंगाबाद-अजिंठा मार्गावर अजिंठा गावाच्या अगोदर एक छोटासा मार्ग व्ह्यू पॉईंटकडे जातो. तेथून नालाकृती आकारात पसरलेल्या अजिंठा लेण्याचे विलोभणीय दृष्य दिसते. निवास · अजिंठा लेणी परिसरात ट्रॅव्हलर्स लॉज फर्दापूर येथे पर्यटक निवास व शासकीय विश्रामगृह. अंतर · औरगाबाद ११२ फर्दापूर ६, जळगाव ६१, मुंबई (मार्गे औरंगाबाद ४९२. मुंबई (मार्गे जळगाव) ४२५ कि.मी

**आपेगाव :** ता पैठण. गोदावरीच्या तीरावरील संत ज्ञानेश्वरांचे जन्मस्थान अंतर पैठण १५, औरगाबाद ६४ कि मी.

**उपळा :** ता कन्नड जि. औरंगाबाद कालीमठ व ब्रह्मलीन प पू. स्वामी प्रणवानंद महाराज यांचे समाधी मंदिर जवळची ठिकाणे पितळखोरा, गौताळा अभयारण्य

**औरंगाबाद :** ऐतिहासिक शहर. जुने नाव खडकी हल्ली संभाजीनगर म्हणूनही उल्लेख होऊ लागला आहे. गेल्या दहा पंधरा वर्षांत शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात प्रचंड वाढ चिकलठाणा, पंढरपूर व वाळूज या ठिकाणी मोठ्या उद्योगांची स्थापना प्रेक्षणीय ठिकाणे : बीबीका मकबरा, पाणचक्की, मराठवाडा विद्यापीठ, सोनेरी महाल, किलेआर्क, औरंगाबाद लेण्या श्री निपटनिरंजन व श्री बाळकृष्णमहाराजांची समाधी मंदिरे. जवळच साताऱ्याचे खडोबा मदिर व जटवाड्यास जैन मदिर. दहा कि मी वर चिकलठाणा विमानतळ आहे. येथून मुंबई व उदयपूर, जोधपूर, जयपूर व दिल्ली अशी विमानसेवा आहे. औरंगाबाद-मनमाड या मीटरगेजचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाले असून आता औरंगाबादहून मुबईस थेट प्रवास करता येतो. जवळची ठिकाणे दौलताबाद, वेरूळ, पितळखोरा, अजिंठा लेणी, पैठण, आपेगाव, देवगड या सर्व स्थळाना भेटी देण्यासाठी औरगाबाद हे पर्यटन केंद्र सोयीचे आहे निवास पर्यटक निवास हॉटेल्स. अंतर शिर्डी १५३ शेगाव २२० सप्तशृंगगड २२० कि मी

**कचनेर :** श्री. चिंतामणी पार्श्वनाथ अतिशय क्षेत्र औरंगाबाद ३७ कि.मी

**खुलताबाद :** खुलताबाद म्हणजे स्वर्गाचे द्वार येथे अनेक दर्गे व मुस्लिम संताच्या कबरी आहेत. रुढ नाव खुलताबाद. औरंगजेब बादशहाची कबर. ही कबर बादशहाच्या इच्छेनुसार त्याचे गुरू जैनोद्दीन शिराजी यांच्याजवळ अगदी साधी बांधली आहे. येथे हजरत महंमद पैगंबरसाहेब यांचा

पोषाख व पवित्र केस ठेवण्यात आला आहे. या गावाचे प्राचीन नाव भद्रावती. नंतरचे रत्नापूर. येथे भद्रा मारुतीचे पुरातन मंदिर आहे, हा मारुती झोपलेल्या अवस्थेत आहे. हे स्थान स्वयभू व जागृत समजले जाते. जवळची ठिकाणे · वेरुळ, म्हैसमाळ, शुलिभंजन वेरुळहून अजिंठ्यास जाण्यासाठी खुलताबाद-फुलंब्री हा जवळचा मार्ग आहे. निवास : शासकीय विश्रामगृह

**गौताळा :** ता. कन्नड सातमाळा रांगात २८१ चौ कि.मी. परिसरात पसरलेले अभयारण्य. गौतमगुफा, सीता न्हाणी, हे प्राचीन अवशेष. निवास : विश्रामधाम. कन्नडच्या उत्तरेस १० कि मी

**दौलताबाद :** ता. औरंगाबाद. प्रसिद्ध ऐतिहासक किल्ला पूर्वीचे नाव देवगिरी हा किल्ला यादवानी बाधला राजा रामदेवरायाच्या काळात दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीने हा किल्ला जिंकला व यादवाचे राज्य सपुष्टात आले महमद तुघलकाने काही महिन्यासाठी दिल्लीहून भारताची राजधानी येथे आणली व देवगिरीचे नाव दौलताबाद ठेवले किल्ल्याभोवती भक्कम तटबंदी असून किल्ल्याच्या मुख्य भागाच्या सभोवती खोल खदक आहे किल्ल्यात वर चढताना मध्यभागात अधाराने व्यापलेला मार्ग आहे. येथे शत्रूला मारण्यासाठी गरम तवा असून शत्रू तेथून निसटलाच तर त्याला एक अरु द वाट दिसते त्यातून तो सरळ खदकात पडतो. प्रेक्षणीय मेढा तोफ, दुर्गा तोफ श्री. दत्त व जनार्दनस्वामींच्या पादुका, गणपती मंदिर, भारतमातेचे मंदिर व ३३ मीटर उंचीचा चांदमिनार अंतर · औरंगाबाद १३ कि मी

**पितळखोरा :** ता कन्नड येथील बौद्ध लेण्या भारतातील सर्वात जुन्या लेण्या समजल्या जातात. एकूण १३ लेण्या आहेत. काही लेण्यात रंगीत भित्तिचित्रे अजूनही शिल्लक आहेत. अंतर : कन्नड १०, चाळीसगाव ३२, औरंगाबाद ७८, मुंबई ४६६ कि मी

**पैठण :** गोदावरीच्या तीरावरील प्रसिद्ध ऐतिहासिक व धार्मिक ठिकाण प्राचीन नाव प्रतिष्ठान दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध शककर्ते सातवाहनांची राजधानी ज्ञानेश्वरांनी येथे रेड्याच्या मुखातून वेद वदविले. संत एकनाथांचे जन्मस्थान व समाधी मदिर महानुभव पथाचे व जैन धर्मीयाचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र प्राचीन काळापासून जरिकाम व कलाकुसर असलेल्या येथील पैठणी साड्या प्रसिद्ध प्रेक्षणीय ठिकाणे श्री एकनाथ महाराजाचा वाडा, श्री एकनाथ महाराजांचे समाधीस्थान, दत्तमदिर, नृसिंह मदिर, नवनाथमंदिर, तीर्थखांब येथील जायकवाडी धरण, नाथसागर, संत ज्ञानेश्वर उद्यान, नियोजित संतपीठ व पैठणी उद्योग इत्यादींमुळे पैठणला पुन्हा वैभव प्राप्त झाले आहे व अतिमहत्त्वाच्या पर्यटन क्षेत्राचे स्थान लाभले आहे वृदावन व शालिमार गार्डनच्या धर्तीवर तयार केलेले ज्ञानेश्वर उद्यान, त्यातील रात्रीची प्रकाशयोजना, सगीतमय कारंजी, धरणाची पार्श्वभूमी यामुळे हे उद्यान पर्यटकांचे महत्त्वाचे आकर्षण केद्र बनले आहे, जवळच आपेगाव हे ज्ञानेश्वरांचे जन्मगाव अंतर औरगाबाद ५० कि मी

**म्हैसमाळ :** ता. खुलताबाद ९१३ मीटर उंचीवरील थंड हवेचे निसर्गरम्य ठिकाण श्री. गिरिजादेवीचे मंदिर गोरक्षनाथाचे मदिर. टी. व्ही. टॉवर जवळची ठिकाणे खुलताबाद, वेरुळ, शुलिभंजन निवास विश्रामगृह अतर : औरंगाबाद ४०, मुंबई ४१५ कि मी

**वेरुळ :** ता खुलताबाद जगप्रसिद्ध लेणी या लेणी समुदायात एकूण ३४ लेण्या असून त्यात १३ बौद्ध १६ हिंदू व ५ जैन धर्मीय आहेत १६ क्रमांकाची कैलास लेणी म्हणजे डोंगरात कोरलेला एक महान चमत्कार होय. 'आधी कळस मग पाया' या स्थापत्य कला प्रकारातले जागतिक आश्चर्य. ही लेणी राष्ट्रकूट राजा कृष्ण याने खोदली येथून एक किलोमीटर अंतरावर बारा ज्योतिर्लिंगापैकी घृष्णेश्वराचे पवित्र स्थान आहे बारा ज्योतिर्लिंग कुड आहे गणेशाचे २१ आद्यपीठांपैकी

लक्षविनायक मंदिर व मंदिराजवळ शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे यांच्या गढीचे अवशेष आहेत येथे जैनमदिर आहे. निवास : कैलास हॉटेल व खुलताबादचे शासकीय विश्रामगृह अंतर · खुलताबाद ५, औरंगाबाद २८, पुणे २६८, मुंबई ३९४, पितळखोरा ५० कि.मी.

**शुलिभंजन** : ता. खुलताबाद. निसर्गरम्य प्राचीन क्षेत्र. येथे मार्कंडेयऋषी व लोपामुद्रा यानी तपश्चर्या केली. येथेच संत एकनाथ महाराजानी तपश्चर्या केली व जनार्दनस्वामींनी त्यांना येथेच मलंग वेशात दत्तदर्शन घडविले ज्या शिळेवर बसून संत एकनाथांनी साधना केली व जेथे त्यांना दत्तदर्शन घडविले त्या शिळेवर दत्तमंदिर उभारण्यात येत आहे. जवळच एक शिळा आहे, ज्यावर आघात केल्यास त्यातून मंजूळ आवाज निघतो. दर्शनीय ठिकाणे : केवलेश्वर मदिर, सूर्यकुंड, चद्रकुड. खुलताबादहून ५ कि.मी. आत हे स्थान आहे.

## १७. जालना

**अंबड** : मत्स्योदरी देवीचे मंदिर, खंडोबाचे मदिर व पुष्करणी प्रसिद्ध.

**जालना** : जिल्ह्याचे मुख्यालय. शैक्षणिक केद्र. आनंदीस्वामींचा मठ, गणपती मंदिर, राममंदिर प्रसिद्ध

**जयदेववाडी** : ता भोकरदन. महानुभाव पंथाचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र या गावास जाळीचा देव असेही म्हणतात

**जांबसमर्थ** : ता. घनसावंगी श्री समर्थ रामदासस्वामींचे जन्मस्थान धुळ्याचे श्री समर्थ भक्त श्री शकर, श्रीकृष्ण देव यांनी १९०५ साली श्री समर्थांच्या या जन्मस्थानाचा शोध लावला व १९३२ साली येथे श्रीसमर्थांचे मंदिर उभारण्यात आले निवास : विश्रामधामात निवासाची व प्रसादाची सोय मनमाड-हैदराबाद मार्गावरील परतूर हे सोयीचे रेल्वे स्थानक. औरंगाबाद, जालना व परतूरहून बससेवा. जवळची ठिकाणे सावरगाव येथे श्री यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांचे चतुर्वेदेश्वर धाम, नागोबाचीवाडी येथील पुरातन नागोबाचे मंदिर.

**राजूर** : ता भोकरदन. श्री महागणपतीचे स्वयंभू जागृत स्थान. जालना-भोकरदन मार्गावर

## १८. परभणी

**औंढानागनाथ** : बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक स्थान. येथील नागनाथ मंदिर हेमाडपथी असून द्वादशकोनी आहे. शिल्पकला वाखाणणीय आहे. हे मंदिर पांडवांनी बांधले. संत विठोबा खेचर इथलेच. संत नामदेव जवळच्याच नरसीचे. नामदेवाच्या कीर्तनाच्या वेळी नागनाथ मदिराने आपले तोंड फिरवले असे समजतात जवळची ठिकाणे सिद्धेश्वर व येलदरी ही धरणे व सहलीची ठिकाणे. नेमगिरी व शिरडशहापूर ही जैन क्षेत्रे निवास अंतर · परभणी ४०, नांदेड ६४, नागपूर ३५९, औरगाबाद २१०, मुंबई ५७९ कि मी

**गंगाखेड** : गोदावरी नदीच्या काठी वसलेले पवित्र क्षेत्र नदीवर मंदिरे व घाट आहेत संत जनाबाईची येथे समाधी आहे, बालाजी मंदिर प्रेक्षणीय

**नरसी** : ता. हिंगोली सत नामदेव महाराजांचे जन्मस्थान येथील नृसिंह देवालय प्रसिद्ध जवळच बामणी येथील अन्नपूर्णा व सरस्वती मंदिरे प्रेक्षणीय

परभणी : जिल्ह्याचे मुख्यालय. कृषि विद्यापीठ. शैक्षणिक केंद्र.

## १९. नांदेड

**उनकेश्वर** : ता. किनवट गरम पाण्याचे झरे जवळची ठिकाणे माहूरचे रेणुकामातेचे मंदिर, किनवट अभयारण्य

**किनवट** : १३८ चौ.कि.मी. पेणगगेच्या परिसरात नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांत हे वन्य प्राणी अभयारण्य पसरलेले आहे, येथे वाघ, चित्ते इ. प्राणी तसेच रंगीबेरंगी पक्षी आढळतात.

**कंधार** : प्राचीन ऐतिहासिक शहर. भुईकोट किल्ला येथे उत्खननात वास्तुपुरुषाचे अवशेष सापडले आहेत भारतात वास्तुपुरुषाचे मिळालेले हे पहिलेच अवशेष आहेत. तसेच केशवराजची सुंदर व अभंगमूर्ती येथील उत्खननात सापडली राष्ट्रकूट व चालुक्य राजवटीत हे शहर अतिशय उर्जितावस्थेत होते.

**नांदेड** : गोदावरी नदीवरील प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक स्थान प्राचीन नाव नंदिग्राम शिखांचे दहावे व शेवटचे गुरू, श्रीगुरुगोविंदसिंहजी यांची १७०८ साली येथे हत्या झाली. म्हणून या स्थानास अनन्यसाधारण महत्त्व आहे येथे आठ गुरुद्वारा आहेत १ तख्त सचखंड श्री हुजूर अचबलनगर साहेब (समाधीस्थान), २ मालटेकडीसाहेब, ३ संगतसाहेब, ४ हिराघाटा, ५. मातासाहेब, ६. बंदाघाटसाहेब, ७, शिकारघाट, ८ नगिनाघाट. १८३० ते १८३९ च्या दरम्यान महाराजा रणजितसिंगानी येथील समाधीस्थान व तख्तसचखंड गुरुद्वारा बांधला जवळची ठिकाणे : श्री दासगणू महाराजांचे समाधीस्थान गोरठा, गोदावरी आसना संगमावरील त्रिकूट. अंतर : मनार धरण ४८, माहूर १२८, किनवट अभयारण्य १३०, औंढा नागनाथ ६४, औरंगाबाद २६० मुबई ५९५, नागपूर ३२२ कि.मी.

**माहूर** : ता. किनवट प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक क्षेत्र. देवीच्या साडेतीन पीठांपैकी श्री रेणुकामातेचे जागृतपीठ येथे सती अनसूयेचे तसेच दत्तशिखरावर दत्तात्रयांचे मंदिर आहे दत्तात्रयांचे हे जन्मस्थान श्री रेणुकामातेच्या मंदिरासमोर प्राचीन रामगड किल्ला आहे. निवास : शासकीय विश्रामगृह व हॉटेल्स अतर नांदेड १२८, किनवट ४५,मुंबई ७८९ कि.मी

**विष्णुपुरी** : ता. नांदेड नांदेडजवळील गोदावरी नदीवरील आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प

**सहस्त्रकुंड** : ता. किनवट धबधबा व रमणीय ठिकाण.

## २०. लातूर

**उदगीर** : भुईकोट किल्ला किल्ल्यात उदागीरबाबांची समाधी आहे इ. स. १७६० मध्ये पेशवे व हैदराबादचे निजाम यांच्यात येथे लढाई झाली त्यात सदाशिवरावभाऊंनी निजामाचा पराभव केला. जवळच हत्ती बेट म्हणून एक रमणीय ठिकाण आहे येथे गंगाराम महाराजाची समाधी असून दसऱ्याच्या दिवशी मोठी यात्रा भरते.

**औसा** : किल्ला श्री मल्लिनाथ महाराजांचा मठ. संतकवी जीवनदासांचे जन्मस्थान

**खरोसा** : ता. औसा. लातूर-बीदर मार्गावर निलग्याच्या अलीकडे टेकडीवर या लेण्या आहेत. या लेण्या वाकाटक काळातील सहाव्या शतकातील असाव्यात टेकडी दीड कि.मी. लांब व अर्धा कि.मी

भू-प्रवास

रुद आहे. या ठिकाणी नृसिंह, शिवपार्वती, कार्तिकेय, रावण, ताडवनृत्य, समुद्रमंथन इ. कोरीव कलाकृती आहेत. जवळची ठिकाणे निलंग्याचे नीलकठेश्वर व शिरुर अनंतपाळचे अनतेश्वर मंदिर.

**लातूर** : जिल्ह्याचे मुख्यालय ऐतिहासिक शहर. या शहराचा सातवाहन, राष्ट्रकूट वंशाशी सबंध आला. श्री. शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक येथे येऊन गेले श्री. सिद्धेश्वर हे येथील ग्रामदैवत. श्री केशवराजाची मूर्ती प्रेक्षणीय. जैन धर्मपीठ शैक्षणिकदृष्ट्या प्रगतिपथावरील शहर

## २१. उस्मानाबाद

**उस्मानाबाद :** बालाघाटच्या रागेत वसलेले प्राचीन शहर. प्राचीन नाव धाराशीव. १९१० मध्ये उस्मानाबाद नाव मिळाले. जवळची ठिकाणे : धाराशीव लेणी ८, संत गोराकुंभारांचे तेर ३२, तुळजापूर २३, नळदुर्ग ५३, निलंगा १०७, उदगीर १७३ किमी

**डोमगांव** : ता. परडा. कल्याणस्वामींची समाधी व मठ येथे कल्याणस्वामींनी लिहिलेली दासबोधाची हस्तलिखित प्रत आहे.

**कुंथलगिरी :** ता. भूम उंच डोंगरावर अनेक मंदिरे असलेले सुप्रसिद्ध जैन तीर्थक्षेत्र. जैनमुनी श्री शांतिसागर यांची समाधी व मानस स्तंभ. बीड, उस्मानाबाद मार्गावरील कुंथलगिरी फाट्याजवळ

**तुळजापूर :** देवीच्या साडेतीन पीठापैकी श्री तुळजाभवानी देवीचे आद्य पीठ हे स्थान बालाघाट रांगेच्या एका कड्यावर वसलेले आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री छत्रपती शिवाजीमहाराजांची कुलदेवता श्री तुळजाभवानीने शिवाजीमहाराजांना प्रत्यक्ष दर्शन देऊन स्वराज्य स्थापनेसाठी भवानी तलवार दिली असे मानले जाते दर्शनीय ठिकाणे : कल्लोळ व गोमुख तीर्थ, घाटशिळावरील देवीचे मंदिर. निवास पर्यटक निवास, धर्मशाळा, शासकीय विश्रामगृह अतर उस्मानाबाद २३, सोलापूर ४५, औरगाबाद २५७, मुंबई ४५२ कि.मी.

**तेर :** ता उस्मानाबाद. तेरणा नदीवरील प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक ठिकाण. उत्खननातून या शहराचे प्राचीनत्व सिद्ध झाले आहे, सातवाहन, इक्ष्वाकू व वाकाटकांच्या काळात हे शहर वैभवाच्या शिखरावर होते. त्याकाळी येथून पाश्चात्य देशाशी व्यापार होत असे. संत गोराकुंभाराचे हे जन्मस्थान व समाधीस्थान येथील १५०० वर्षापूर्वीचे त्रिविक्रम मंदिर व सातव्या शतकातील उत्तरेश्वराचे मदिर स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध उत्तरेश्वराच्या लाकडी दारावरील नक्षीकाम वाखाणणीय. कै. रामलिंगअप्पा लामतुरे यानी येथे फार मोठा ऐतिहासिक वस्तूचा संग्रह केला आता शासनाने वस्तूसंग्रहालय सुरू केले आहे अंतर उस्मानाबाद ४०, ढोकी ५, मुंबई ४३४ कि मी

**नळदुर्ग** : ता तुळजापूर बोरी नदीवर कल्याणीच्या चालुक्य राजाने बाधलेला किल्ला नदीवर बांध घालून त्यात बांधलेला पाणी महाल प्रेक्षणीय जवळ अणदूर येथे खडोबाचे मंदिर.

**परंडा :** इतिहासप्रसिद्ध किल्ला महंमद गावानने बाधला. २६ बुरुजांची भक्कम तटबंदी आणि भव्य खंदक. काही मोठ्या तोफा किल्ल्यात आहेत, हे गाव सीना व दुधना नदीकाठी आहे. येथे हंसराज

स्वामींचा मठ आहे. जवळची ठिकाणे : सोनारी भैरवनाथ मंदिर, डोमगाव येथे समर्थांचे पट्टशिष्य कल्याणस्वामींची समाधी, व त्याच्या हस्ताक्षरातील दासबोधाची प्रत.

# २२. बीड

**अंबाजोगाई :** योगेश्वरीदेवीचे पीठ. खोलेश्वर मंदिर. मराठीचे आद्यकवि मुकुंदराज व पासोडीकार दासोपंत याची समाधीस्थाने. कोरीव लेणी. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रसिद्ध आहे. अंतर : परळी वैजनाथ रेल्वे स्थानक ३५, बीड ९५, औरंगाबाद २३३, मुबई ४९५ कि.मी.

**कपिलधार :** रम्य परिसर श्री. स्वामी मन्मथनाथांची समाधी मांजरसुंब्याहून जाता येते.

**धारुर :** किल्ला. व्यापारी पेठ.

**नामलगाव :** ता बीड. बिंदुसरा नदीवरील गणपतीचे पुरातन मंदिर. भारतातील २१ गणेशपीठांपैकी एक पीठ

**परळी वैजनाथ :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी वैजनाथ ज्योतिर्लिंगाचे जागृत स्थान. पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकरांनी या मदिराचा जीर्णोद्धार केला. टेकडीवर चिरेबंदी भव्य मंदिर आहे. मंदिराच्या परिसरात जाताच लांबलचक पसरलेल्या भरपूर पायऱ्या व भव्य प्रवेशद्वार लक्ष वेधून घेते. येथील मंदिरात गर्भगृह व सभामंडप एकाच पातळीवर आहेत. त्यामुळे सभामंडपातून ज्योतिर्लिंगाचे दर्शन होऊ शकते इतरत्र असे नाही. येथे देवाला स्पर्श करून सर्वांना दर्शन घेता येते मंदिराभोवती तीन प्रचंड कुंडे आहेत. येथे औष्णिक विद्युतकेंद्र आहे. जवळची ठिकाणे : गंगाखेड, धर्मापुरी, पूस, शेळगाव हा मंदिरांचा परिसर, डिघोळ इस्लामपूर येथील रेणुकादेवीचे ठाणे, अंबाजोगाईचे योगेश्वरी देवीचे मदिर. निवास : धर्मशाळा, मंदिरात निवासाची व्यवस्था. अंतर : अंबाजोगाई ३५, परभणी ६१, बीड १००, नांदेड १२०, औरंगाबाद २३० मुंबई ५०२ पुणे ३०० कि.मी.

**बीड :** प्राचीन नाव चंपावती. बिंदुसरा नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेले ऐतिहासिक ठिकाण प्रेक्षणीय ठिकाणे : कनकालेश्वर मंदिर, खंडोबाचे मंदिर, प्राचीन किल्ला. जवळची ठिकाणे : खजाना विहीर, कपिलधार व लिंबगाणेश, नवगणराजुरी व नामलगावची गणेश मंदिरे.

**राक्षसभुवन :** ता गेवराई. गोदावरी नदीच्या काठावरील प्राचीन जागृत शनिमंदिर. भारतातील २१ गणेशपीठांपैकी एक पीठ. थोरले माधवराव पेशव्यांनी येथे निजामाचा पराभव केला निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हा येथेच मारला गेला त्याची येथे समाधी आहे. जवळच महानुभवांचे पाचाळेश्वर हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. निवास : धर्मशाळा, शासकीय विश्रामगृह. अंतर : शहागड-गेवराई मार्गावर १४ किलोमीटर आत.

**सौताडा :** ता पाटोदा. धबधबा व धार्मिक ठिकाण. जवळच नायगाव येथे मयूर अभयारण्य.

# २३. बुलडाणा

**देऊळगावराजा :** बालाजी मंदिर. मोठी यात्रा भरते विदर्भातील एक श्रीमंत देवस्थान

**बुलडाणा :** जिल्ह्याचे मुख्यालय. निसर्गरम्य स्थान

**मेहकर :** बालाजी मंदिर प्रसिद्ध. अंतर : मुंबई ५८६ कि.मी

**लोणार :** 'लोणार सरोवर' या नावाचा एक आगळा वेगळा नैसर्गिक चमत्कार येथे पाहावयास मिळतो. उल्कानिर्मित सरोवराचे आशियातील हे एकमेव ठिकाण आहे. आकाशातून एक प्रचड उल्का पडल्यामुळे १८०० मीटर व्यासाचा व १७० मीटर खोल असा प्रचंड वर्तुळाकार खड्डा येथे

पडलेला आहे हे उल्कानिर्मित विवर खाऱ्या पाण्याने भरलेले आहे सभोवती व गावात सर्वत्र गोड पाणी आढळते. सतत पडत असलेली गोमुखातून धार हा येथील दुसरा चमत्कार होय या धारेचा उगम गगा नदीत आहे, असे समजले जाते. अनेक पौराणिक कथा या परिसरात दडलेल्या आहेत पुष्कळ मदिरे आहेत. सरोवराच्या अगदी काठावर शासकीय विश्रामगृह आहे. येथून सरोवराचे अतिशय विलोभनीय दृश्य दिसते.

**शेगाव :** संत शिरोमणी गजानन महाराज यांचे प्रगट होण्याचे व समाधीचे स्थान. महाराज येथे २८-२-१८७८ ला प्रगट झाले व ८-९-१९१० रोजी येथेच समाधिस्थ झाले श्रीच्या प्रेरणेने येथे अनेक लोकोपयोगी व शैक्षणिक कार्ये सुरू झाली आहेत, दर्शनीय स्थाने : समाधी मंदिर, देह विसर्जन स्थळ, बंकट सदन, गोविंद मोरे यांचे जुने महादेव मंदिर, श्री गजानन वाटिका, वारकरी शिक्षण संस्था. संस्थानाच्या वतीने मोफत स्थानिक बस व्यवस्था. दुपारी १२ वाजता महाप्रसाद. जवळच ८ कि.मी वर नागझरी क्षेत्र. निवास · सस्थानाच्या वतीने धर्मशाळा व भोजनव्यवस्था, पर्यटन महामंडळाचे यात्री निवास. अंतर . अकोला ४५, नागपूर २८७, मुंबई ५४६, औरंगाबाद २२० कि.मी

**सिंदखेडराजा :** श्री. लखुजी जाधवरावाचे राजधानीचे ठिकाण. श्री शिवाजी महाराजाचे आजोळ, मातोश्री जिजाबाईचे जन्मस्थान. प्रेक्षणीय ठिकाणे · गढी, जिजामातेचे जन्मस्थान, लखुजीराजाची समाधी, मोती तलाव, चांदणी तलाव, पुतळा बारव, सजना बारव, बाळ समुद्र गंगासागर, नीळकंठेश्वर, रेणुका व रामेश्वर मदिर अंतर · जालना ३२, मेहेकर ५६, बुलडाणा ६४, देऊळगावराजा १३ कि.मी.

# २४. अकोला

**अकोट :** श्री नरसिंग महाराजाचे यात्रास्थान सतरंज्या प्रसिद्ध. जवळच नरनाळा किल्ला आहे, अंतर : अकोला ४५ कि.मी.

**अकोला :** जिल्हा मुख्यालय. मोर्णा नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलेले आहे राज राजेश्वराचे मंदिर प्रसिद्ध. पुरातन किल्ला. कृषि विद्यापीठ.

**कारंजा :** श्री गुरुचरित्रातील श्री नृसिंहसरस्वती यांचे जन्मस्थान समर्थ संप्रदायी रामाचा, कल्याणस्वामींचा व भीमदासाचा मठ. या शहरास जैनांची काशी म्हणतात या शहरास लाडाचे कारंजेही म्हणतात. ऋषी तलाव प्रेक्षणीय प्राचीन व्यापारी पेठ शिवाजी महाराजांनी १६७० साली या शहरावर स्वारी केली होती निवास धर्मशाळा

**नरनाळा किल्ला :** ता. अकोट. बालाघाटच्या रांगेत निसर्गरम्य वातावरणात हा किल्ला आहे १४२५ साली बहामनी राजाने हा किल्ला बाधला. येथे वन्य पशू आढळतात. निवास · पायथ्याशी शहानूर गावात धर्मशाळा. अंतर . अकोट २२, अकोला ६६, पोपटखेला १५, मुंबई ६७८ कि.मी.

**बाळापूर :** मन आणि मस या नद्यांच्या संगमावर वसलेले हे एक ऐतिहासिक गाव. जहांगीर, शहाजहान व औरगजेब हे गादीवर येण्यापूर्वी दक्षिणेचे सुभेदार म्हणून बाळापुरास राहिले होते. येथील किल्ला १७२१ मध्ये औरंगजेबाचा मुलगा अदिमशहा याने बांधला. हा किल्ला संपूर्ण विटांचा बांधला आहे. मिर्झा राजे जयसिंग यांनी पाच घुमटांची बांधलेली छत्री प्रेक्षणीय आहे, संगमावर समर्थ रामदासांनी बाळदेवीची स्थापना केली. जवळची ठिकाणे पारस औष्णिक विद्युत केंद्र, श्री गजानन महाराजांचे शेगाव. अंतर · अकोला २५, नागपूर २६७, मुंबई ५७८ कि.मी.

लोणी : ता रिसोड सुप्रसिद्ध संत सखाराम महाराज याचे समाधीस्थान. अकोला जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा येथे भरते निवास · मंदिरात निवासाची व प्रसादाची सोय.

वाशीम : प्राचीन धार्मिक व ऐतिहासिक स्थान. वत्स ऋषींची तपोभूमी. १४ व्या शतकातील वाकाटकाची राजधानी. त्यांचे अनेक ताम्रपट येथे सापडले आहेत. प्राचीन काळी ज्योतिष्यानी पृथ्वीची मध्यरेषा कल्पिली होती. ती रेषा या शहरातून जाते. त्या रेषेवर मध्यमेश्वराचे मदिर आहे. येथील बालाजी मंदिर प्रसिद्ध आहे.

# २५. अमरावती

अमरावती : अबादेवी, एकवीरादेवी व जनार्दनस्वामींची जागृत मदिरं सत गाडगेमहाराजाची समाधी. शैक्षणिक केंद्र. अंतर . चिखलदरा ९८, सालबर्डी ६७, कौंडिण्यपूर ६९, मुक्तागिरी ६२, उमरसरा १८, शेगाव १५० कि.मी

ऋणमोचन : यात्रेचे मोठे ठिकाण.

कौंडिण्यपूर : वर्धा नदीच्या काठावरील प्राचीन शहर. श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी व नल दमयंतीपैकी दमयंतीचे माहेर. अमरावतीपासून ३५ कि.मी

गाविलगड : ता. चिखलदरा. येथील किल्ला प्रेक्षणीय आहे, जवळची ठिकाणे : चिखलदरा, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, नरनाळा किल्ला.

चिखलदरा : सातपुडा रागेतील विदर्भातील प्रमुख थंड हवेचे ठिकाण उंची १११८ मीटर. भीमाने येथे कीचकाचा वध केला व खोल दरीत फेकून दिले म्हणून हे स्थान कीचकदरा झाले. त्यापासून चिखलदरा. महाराष्ट्रातील कॉफी उत्पादनाचे हे एकमेव ठिकाण प्रेक्षणीय ठिकाणे : जवाहरलाल नेहरू वनस्पती उद्यान, गविलगड किल्ला, आदिवासी वस्तुसंग्रहालय, सेमाडोह तलाव नरनाळा किल्ला. जवळची ठिकाणे मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ढाकणे-कोळकाज अभयारण्य. निवास : पर्यटक निवास. अंतर अमरावती ११०, अकोला १५०, नागपूर २२०, मुंबई ७६३ कि.मी.

ढाकणे-कोळेकाज अभयारण्य : वन्यप्राणी अभयारण्य वाघासाठी प्रसिद्ध ढाकणेपासून कोळकाझ २९ कि.मी दूर आहे. सिपना व डोलर या नद्यांच्या खोऱ्यात व डोंगरात हे अभयारण्य पसरलेले आहे, रॉकीडोह फिशिंगसाठी प्रसिद्ध पर्यटन महामंडळातर्फे अमरावती‍ः ा सहलीची सोय जवळची ठिकाणे मेळघाट व्याघ्र प्रकल्प, चिखलदरा, गाविलगड व नरनाळा निवास : वनखात्याचे विश्रामधाम. अतर अमरावती ११४, नागपूर २७९, मुंबई ८२४ कि.मी

बहिरम : ता अचलपूर अचलपूरपासून २२ कि.मी वरील यात्रेचे मोठे ठिकाण. सर्व धर्मीय लोक या यात्रेत येतात. यात्रा महिनाभर चालते. जवळच मुक्तागिरीचे मदिर

माधान : ता. चांदूर बाजार. संत गुलाबराव महाराजांचे जन्मस्थान.

मेळघाट : धारणी व चिखलदरा तालुक्यात पसरलेला व्याघ्र प्रकल्प

मोझरी : ता तिवसा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाधीस्थान

**रिथपूर :** ता. मोर्शी महानुभाव पंथियांचे पवित्र क्षेत्र. हे रिद्धपूर म्हणूनही ओळखले जाते.
**मुक्तागिरी :** जैन तीर्थक्षेत्र निसर्गरम्य स्थान.

## २६. यवतमाळ

**कळंब :** २१ गणेशपीठापैकी चिंतामणी गणपतीचे स्वयंभू स्थान मदिर जमिनीपासून १२ मीटर खोल आहे. पायऱ्या उतरताच गणेशकुंड लागते या कुंडाच्या शेवटी गणेशाची ४ फुट उचीची डाव्या सोंडेची मूर्ती आहे या कुडात प्रत्येक १२ वर्षांनी गंगा अवतीर्ण होते हे एक पुरातन शहर असून येथील उत्खननामध्ये सोन्याची नाणी व अनेक मूर्ती सापडल्या. यवतमाळ १८, वर्धा ४९ कि.मी
**यवतमाळ :** जिल्ह्याचे मुख्यालय शैक्षणिक केंद्र. जगत मंदिर. उंबरडा उद्यान

## २७. वर्धा

**पवनार :** आचार्य विनोबा भावे यांचा धाम नदीकाठी आश्रम या आश्रमास परमधाम म्हणतात. विनोबाजी १९३८ साली येथे आले. विनोबाजींच्या भूदान चळवळीमुळे या आश्रमास देशभर प्रसिद्धी मिळाली वर्धा येथे पर्यटक निवास अंतर : वर्धा १३ कि मी.
**बोर अभयारण्य :** ता. सेलू. बोरी नदीच्या व बोरी धरणाच्या सभोवती ६१ चौ.कि.मी परिसरात हे अभयारण्य पसरलेले आहे. निवास शासकीय विश्रामगृह. अंतर वर्धा ३२, नागपूर ८०, मुबई ८५४ कि.मी.
**वर्धा :** या शहराची स्थापना होऊन केवळ शंभर वर्षे होत आहेत. सेवाग्राम येथे म गाधी व पवनारला विनोबा विनोबाजी भावे याच्या वासतव्यामुळे या शहरास ऐतिहासिक व राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे प्रेक्षणीय ठिकाणे : राष्ट्रभाषा प्रचार समितीचे कार्यालय, मगन सग्रहालय, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ व लक्ष्मीनारायण मंदिर. जवळच गोपुरीस गीताई मंदिरात गीतेचे आठरा अध्याय दगडी स्तभावर कोरलेले आहेत लागूनच भव्य व सुंदर विश्व शांती स्तूप. वर्धा हे मुबई कलकत्ता व दिल्ली मद्रास लोहमार्गावरील महत्त्वाचे जंक्शन आहे. निवास : पर्यटक निवास अंतर : सेवाग्राम ८, पवनार १३, नागपूर ७४, यवतमाळ ६५, मुंबई ८१७ कि.मी
**सेवाग्राम :** म गांधींच्या वास्तव्याने पावन झालेले ठिकाण. गाधीजी १९३६ साली येथे आले व हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे मुख्य केद्र बनले. या आश्रमात अनेक सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आहेत प्रेक्षणीय ठिकाणे · सेवाग्राम आश्रम, बा आणि बापू कुटीर निवास यात्री निवास, वर्ध्यास पर्यटक निवास अंतर : वर्धा ८, नागपूर ७२, मुंबई ८१९ कि.मी

## २८. नागपूर

**कोराडी :** औष्णिक वीज केंद्र यात्रेचे ठिकाण
**खापरखेडा :** औष्णिक वीज केंद्र
**खिंडसी :** घनदाट अरण्याच्या परिसरातील भव्य सरोवर सरोवरात हवलक्रॅफ्ट, वॉटर स्कूटरची व्यवस्था निवासासाठी तंबूची व्यवस्था नागपूर, रामटेक, खिंडसी अशी दररोजची सहल
**नागपूर :** ऐतिहासिक शहर. औद्योगिक व शैक्षणिक केंद्र महाराष्ट्राची उपराजधानी वर्षातून एकदा महाराष्ट्र विधानसभेचे येथे अधिवेशन भरते. राष्ट्रीय महामार्ग, लोहमार्ग व विमानमार्गाचे भारतातील महत्त्वाचे केंद्र पूर्वी येथे गोंड राजांचे राज्य होते सातपुड्यातील भिवगडला त्यांचा किल्ला आहे.

प्रेक्षणीय  अंबाझरी तलाव, तेलंगखेडी उद्यान व तलाव, गांधीसागर, गोरेवाडा तलाव, डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर, बौद्ध दीक्षाभूमी व हुतात्मा शंकर स्मारक. जवळची ठिकाणे : सेवाग्राम ८४, ताडोबा १३७, नवेगाव अभयारण्य १३९, रामटेक ४८, पेंच ८६, अदासा ४०, खापरखेडा २२ कि.मी.

**पेंच राष्ट्रीय उद्यान :** ता. रामटेक. राष्ट्रीय उद्यान. २५७ चौ.कि.मी.मध्ये पसरलेले आहे.

**बुटीबोरी :** येथे आशिया खंडातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत निर्माण होत आहे.

**रामटेक :** रमणीय प्रदेश. राम लक्ष्मणांच्या वास्तव्याने पुनीत झालेले ठिकाण ६०० वर्षापूर्वीचे रामलक्ष्मणाचे देऊळ. कवि कालिदासाने मेघदूत येथे लिहिले..

## २९. भंडारा

**नवेगावबांध :** ता. अर्जुनी मोरेगाव वन्य प्राणी अभयारण्य अंतर : नागपूर १३२ कि.मी.

**नागझिरा अभयारण्य :** ता गोरेगाव. १३६ चौ कि.मी. मध्ये पसरलेले वन्य प्राणी अभयारण्य आहे, दोन मोठे तलाव. निवास : शासकीय विश्रामगृह. अंतर : गोदिंया २५, नागपूर १७० कि.मी.

**पवनी :** वैनगंगेच्या तीरावरील ऐतिहासिक व धार्मिक ठिकाण येथे पुरातन मंदिरे आहेत, मुरलीधर मंदिर प्रसिद्ध जवळच बौद्ध स्तूप आहे. कऱ्हाडा व बालसमुद्र हे तलाव

**भंडारा :** जिल्ह्याचे मुख्यालय बहिरंगेश्वराचे मंदिर व खांब तलाव. पितळी भांड्यांचे कारखाने. बिडी उद्योग, लाकूड कटाई व धानगिरण्या विपुल प्रमाणात.

## ३०. चंद्रपूर

**चंद्रपूर :** ऐतिहासिक शहर गोंड राजाचा किल्ला गावाभोवती मजबूत परकोट आहे. महाकाली व अचलेश्वर मंदिरे. वनविषयक अभ्यासाचे महाविद्यालय. औष्णिक वीज केंद्र. मँगनीज शुद्ध करण्याचा कारखाना. अंतर  नागपूर १५२, मुंबई ९५० कि.मी.

**ताडोबा राष्ट्रीय उद्यान :** ता भद्रावती. वाघ, सांबर, गवा, चिंकारा, नीलगाय, चितळ' व मगरी येथे आढळतात. उद्यान ११७ चौ कि.मी. परिसरात पसरले असून मोटारीतून उद्यानात फिरण्याची व्यवस्था आहे. निवास  शासकीय विश्रामगृह अंतर · चंद्रपूर ४५, नागपूर १३७, मुंबई ९९५ कि मी.

**भद्रावती :** येथे भद्रनाथ मंदिर व पार्श्वनाथ मंदिर आहे. जवळच ..'जासन टेकडीवर बुद्ध लेणी आहे. येथे युद्ध साहित्य तयार करण्याचा कारखाना आहे. चिनी मातीच्या वस्तू येथे चांगल्या तयार होतात.

**सोमनाथ :** ता. मूल. धार्मिक व सहलीचे ठिकाण. दाट जगलांनी वेढलेला धबधबा.

## ३१. गडचिरोली

गडचिरोली : जिल्ह्याचे मुख्यालय

मार्कंडा : ता. चामोर्शी वैनगंगेच्या काठावरील प्राचीन धार्मिक क्षेत्र कोरीव काम असलेले महादेवाचे हेमाडपंथी देऊळ यास मार्कंडदेव असेही म्हणतात. निसर्गरम्य स्थान.

***

# महाराष्ट्र

- क्षेत्रफळ - ३,०७,६९० चौ.कि.मी
- लोकसंख्या - ७,८७,०६,७१९
- जिल्हे - ३१
- तालुके - ३२७
- सागरी किनारा - ७२० कि.मी.
- लोहमार्ग - ५,२९७ कि.मी
- राष्ट्रीय महामार्ग - २९९० कि.मी.
- राज्य महामार्ग - ३०,५४८ कि.मी.
- प्रमुख बंदरे - मुंबई, न्हावाशेवा ही आंतरराष्ट्रीय बंदरे.
  मुरूड, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, देवगड ही इतर बारमाही बंदरे
- प्रमुख विमानतळ - मुंबई हे आंतरराष्ट्रीय विमानतळ,
  पुणे, औरंगाबाद व नागपूर हे प्रमुख विमानतळ.

REFBK-0028601

प्राथमिक वर्गापासून ते एम्.पी.एस्.सी. पर्यंत सर्वांसाठी
अत्यावश्यक विषयांची मूलभूत माहिती
प्रत्येकाने आपल्या घरी संग्रही ठेवावी असे

# नकाशांद्वारा

## जग, भारत व महाराष्ट्राचे

# दृष्टिक्षेपात जनरल नॉलेज


समर्थ उद्योग प्रकाशन © २४०६५

**प्रमुख विक्रेते**

**विज्ञान मंदिर**

औरंगपुरा, औरंगाबाद - ४३१ ००१

मुद्रक- राजमुद्रा ऑफसेट औरंगाबाद